नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

**संपर्क**
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक २०० * * अमरावती * गुरुवार, दिनांक २२ जानेवारी २०२६ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## प्रयागराजमध्ये तलावात कोसळले सैन्याचे विमान

■ **वृत्तसंस्था, प्रयागराज, दि. २१ :** प्रयागराजमध्ये लष्कराचे प्रशिक्षण विमान तलावात कोसळले. विमान अचानक हवेत डगमगले आणि शहराच्या मध्यभागी कोसळले. प्रत्यक्षदर्शींचे म्हणणे आहे की स्थानिक लोकांनी तिघांना वाचवले आहे. सध्या विमानात किती लोक होते हे स्पष्ट झालेले नाही.

हा अपघात बुधवारी दुपारी केपी कॉलेजच्या मागे झाला. स्थानिक लोकांनी घटनेची माहिती पोलीस आणि प्रशासनाला दिली, त्यानंतर अग्निशमन दल आणि बचाव पथक घटनास्थळाकडे रवाना झाले. प्रशासनाचे पथक घटनास्थळी पोहोचून परिस्थितीचा आढावा घेत आहे. आतापर्यंत तीन लोकांना बाहेर काढण्यात आले आहे. तिघेही लोक गणवेशात होते.

## मोदीजींचे बॉस




आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी कधीकधी इतके नम्र होतात की, त्यामुळे नम्रताही लाजून चूर होऊ शकते. अख्ख्या जगात कोणी बॉस आहे असे म्हटलं तर लोक त्याला वेड्यात काढतील. अरे पण वेड्या लोकांनो खुद्द मोदीजी यांनीच हे जाहीर केले आहे की भारतीय जनता पक्षाच्या अध्यक्षपदी विराजमान झालेले नितीन नबीन हे माझे बॉस आहेत. नितीन या नावामुळे आश्चर्य वाटून घेऊ नका कारण ते नाव सर्वतोमुखी असते. पण त्याला नबीनचीही जोड मिळाली की मग तो बॉस बनतो. असे हे नितीन नबीन आणि भारतीय जनता पक्ष समवयस्क आहेत. १९८० च्या एप्रिल महिन्यामध्ये आपल्या मुंबई नगरीमध्ये भारतीय जनता पक्षाची स्थापना झाली होती. पक्षाची स्थापना झाली तेव्हाच ४५ वर्षानंतरच्या अध्यक्षाचा जन्मही झाला. वडिलांच्या अकाली निधनामुळे अगदी तरुण वयात नितीन नबीन यांना आपल्या वडिलांच्या जागेवर आमदार होत आले. पक्षातील ज्येष्ठ नेत्यांनी या नितीनजींना अरेतुरे करू नये म्हणून त्यांच्यासाठी वेगळ्या शब्दाची योजना करण्यात आलेली आहे. त्यांना यापुढे नावाने पुकारता 'अध्यक्षजी' म्हणून संबोधावे, असे सांगण्यात आले आहे हे नक्कीच महत्त्वाचे आहे. सध्याच्या काळातच नाही तर पूर्वी सुद्धा भारतीय जनता पक्षामध्ये अनेकदा नवखे अध्यक्ष नेमण्यात आलेले आहेत. नितीनजी गडकरी जेव्हा अध्यक्ष झाले तेव्हा ते फक्त ५२ वर्षांचे होते म्हणजेच, तोपर्यंत झालेल्या अध्यक्षांमध्ये ते सर्वाधिक तरुण होते, महाराष्ट्रातून आमदार होते. अगदी त्याच प्रकारे झारखंडमधील आमदार असलेल्या नबीन यांना अध्यक्षपदावर बसवण्यात आलेले आहे. या ठिकाणी एक जुनी आठवण सांगणे खूप गरजेचे आहे ती म्हणजे, २०१३ साली भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारणीच्या बैठकीत अत्यंत आग्रहाने पंतप्रधान पदासाठी नरेंद्र मोदी हेच सर्वात जास्त लायक उमेदवार आहेत. याचा प्रचारही आताच्या भारतीय जनता पक्षाच्या अध्यक्षांनी म्हणजेच नितीन नबीन यांनी केला होता. आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीच त्यांना बॉस म्हटल्यामुळे या बॉसचा ज्याच्या-ज्याच्या वर कृपाकटाक्ष होईल तो खास बनणार आहे, यात शंकाच नाही. भारतीय जनता पक्षाच्या पक्षाध्यक्ष पदावर या आधीचे अध्यक्ष नड्डाजी तरी कुठे जुने होते, पण इतकी वर्ष त्यांची हुकूमत पक्षावर नव्हती काय? किंबहुना नड्डाजी इतके प्रज्ञावंत होते की त्यांनी एकदा, भारतीय जनता पक्ष आता इतका मोठा झाला आहे. त्यामुळे भारतीय जनता पक्षाला सध्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची गरज उरलेली नाही, असे आत्मविश्वासपूर्वक सांगून त्यांनीही आपली बॉसगिरी दाखवली होती. राजकारणात तेच ते चेहरे देऊन जनतेला बोअर करण्यापेक्षा नवनवीन छबीचे चेहरे देऊन पक्षाची लोकप्रियता दाखवायची असते, वाढवायची असते. कोणे एकेकाळी पंडित जवाहरलाल नेहरू पंतप्रधान असताना असे म्हटले जायचे की खांबाला जरी उभे केले तरी तो निवडून येईल. तो काँग्रेसचा काळ होता पण गेल्या काही दिवसात काँग्रेसच्या इमारतीतील अनेक खांब वाळवीने पोकळ केलेले आहेत. सत्ता असली की आपोआपच जादूची छडी चालते, सत्ता गेली की त्याक्षणी त्या छडीची जादू आपोआपच नष्ट होते. सध्या संपूर्ण देशात भारतीय जनता पक्षाचा वारू चौफेर विजयाचे झेंडे फडकवित आहे. अशा विशाल आणि प्रभावशाली पक्षाच्या अध्यक्षपदावर नितीन नबीन विराजमान झालेले आहेत. त्यांच्या सत्तेचा सूर्य आता तळपतच राहणार आहे. ज्या नितीन नबीन यांच्याकडे नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांच्यासारखे आज्ञाधारक शिष्य आहेत. त्या पक्षाच्या अध्यक्षजींना काळजी करण्याचे अजिबात कारण नाही. आपल्या देदीप्यमान प्रतिभेने भारतीय जनता पक्षाचे नवीन अध्यक्ष आपल्या विजयाचे फासे फेकून संपूर्ण भारत भाजपमय करण्यासाठी झटणार आहेत ते त्यांनी आधीच सांगितलेले आहे. दुसऱ्या एखाद्या पक्षात सत्तेच्या सर्वोच्च स्थानावरील व्यक्ती पक्षाच्या अध्यक्षपदी असलेल्या व्यक्तीबद्दल इतका आदर दाखवील काय? भारतीय जनता पक्ष शिस्तीचा भोक्ता आहे. त्यामुळेच या पक्षाचे पोक्त नेतृत्व आपल्या नवीन अध्यक्षाला घेऊन पक्षाला यशाच्या गिरीशिखरावर नेऊन ठेवतील, यामध्ये शंका बाळगण्याचे कारण नाही.

mahasagarngp@gmail.com
Mob. No. 9922970023

# क्रिकेटप्रेमींच्या उत्साहाला उधाण!

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २१ :**
दीर्घ कालावधीनंतर नागपुरच्या जामठा स्टेडियममध्ये भारत आणि न्युझिलंड यांच्यात रंगलेल्या टी २० सामन्याच्या पार्श्वभूमिवर क्रिकेट प्रेमींच्या उत्साहाला उधाण आले होते. अर्धीअधिक उपराजधानी भारतीय क्रिकेट संघाचा पोशाख असलेल्या निळ्या रंगात न्हावून निघाल्याचे दिसून आले.

भारत आणि न्युझिलंडमध्ये टी २० मालिकेतील पहिला सामना बुधवारी नागपुरच्या जामठा स्टेडियममध्ये खेळला गेला. यासाठी दुपारपासूनच जामठाकडे जाणारे मार्ग चाहत्यांच्या गर्दीने फुलून गेले होते. सर्वच मार्गावर वाहनांची प्रचंड गर्दी झाली होती. अनेकांनी मेट्रोचा मार्ग स्वीकारला.

दरम्यान, नाणेफेक गमावल्यानंतर फलंदाजीस आलेल्या भारतीय संघातील अभिषेक शर्मा याने ८ षटकार आणि ५ चौकार ठोकत केवळ ३५ चेंडून ८४ धावांची स्फोटक खेळी केल्याने पैसा वसूल... अशी प्रतिक्रिया प्रेक्षकांमधून आली. रिंकू सिंहच्या धडाकेबाज फलंदाजीचाही स्टेडियम मधील दर्शकांनी मनसोक्त आनंद लुटल्याचे दिसून आले.




## आर्वीत माथेफिरूचा हैदोस

### भाजी बाजारात तिघांना काठीने मारहाण : शेतकऱ्याची हत्या

■ **महासागर प्रतिनिधी, वर्धा, दि.२१ :** वर्धा जिल्ह्यातील आर्वी शहरात आज बुधवारी सकाळच्या सुमारास एका माथेफिरू युवकाने घातलेल्या उच्छादामुळे संपूर्ण परिसर हादरला आहे.

शहरातील गजबजलेल्या इंदिरा भाजी मार्केट परिसरात एका २२ वर्षीय माथेफिरूने लाकडी काठीने केलेल्या अमानुष मारहाणीत एका ७० वर्षीय वृद्ध शेतकऱ्याचा जागीच मृत्यू झाला, तर अन्य दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. शेतमाल विकण्यासाठी आलेल्या कष्टकऱ्यांवर असा जीवघेणा हल्ला झाल्याने हळहळ व्यक्त केली जात आहे.

आर्वी येथील रहिवासी असलेल्या मथुरेश उर्फ मत्या लाडके (वय २२) या माथेफिरू युवकाने नग्नावस्थेत आज सकाळी इंदिरा भाजी मार्केटमध्ये अचानक धुमाकूळ घातला. त्याच्या हातात एक मोठी लाकडी काठी होती. मार्केटमध्ये भाजीपाला आणि इतर शेतमाल घेऊन आलेले शेतकरी आपल्या कामात व्यस्त असताना मथुरेशने त्यांच्यावर हल्ला चढवला.

त्याने संजय रामकृष्ण राऊत (वय ७०) यांच्या डोक्यावर काठीने इतक्या जोरात प्रहार केले की, राऊत यांची यांची कवटी फुटून, मेंदू रस्त्यावर पडला होता. यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. राऊत हे शेतकरी असून ते आपला माल विक्रीसाठी बाजारात आले होते.



राऊत यांच्यावरील हल्ल्यानंतर या माथेफिरूने तिथेच उपस्थित असलेले दुसरे शेतकरी रामराव महादेवराव वांगे (वय ८५) आणि शहजाद यांच्यावरही हल्ला केला. काठीने केलेल्या या जबर मारहाणीत हे दोघेही गंभीर जखमी झालेत. भरबाजारात सुरू असलेला हा थरार पाहून विक्रेते आणि ग्राहकांची एकच पळापळ झाली.

घटनास्थळी उपस्थित नागरिक आणि काही धाडसी तरुणांनी माथेफिरू मथुरेशला घेराव घातला आणि त्याला जागीच पकडले. माहिती मिळताच आर्वी पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत आरोपीला ताब्यात घेतले. त्याची मानसिक स्थिती बिघडलेली असल्याने त्याला सुरुवातीला उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय तपासणीसाठी नेण्यात आले.

गंभीर जखमी रामराव वांगे आणि शहजाद यांना आर्वीतील रुग्णालयात नेण्यात आले, मात्र त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना सेवाग्राम रुग्णालयात हलवण्यात आले आहे.

## शिवसेना-राष्ट्रवादी पक्षचिन्हाची सुनावणी पुन्हा लांबणीवर

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २१ :** महाराष्ट्रातील सत्तासंघर्षाशी संबंधित शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या पक्ष आणि चिन्हाच्या वादावरील सर्वोच्च न्यायालयातील महत्त्वाची सुनावणी पुन्हा एकदा लांबणीवर पडली आहे.

आज, २१ जानेवारी रोजी सरन्यायाधीशांच्या खंडपीठासमोर या प्रकरणावर सुनावणी होणार होती, मात्र आता ही सुनावणी येत्या शुक्रवारी होणार असल्याची माहिती समोर आली आहे.

शिवसेना पक्ष आणि निवडणूक चिन्हासंदर्भातील वाद गेल्या तीन वर्षांपासून सर्वोच्च न्यायालयापुढे प्रलंबित आहे. २१ जानेवारी रोजी सरन्यायाधीशांच्या खंडपीठासमोर या याचिकेवर सुनावणी होणार असून, त्याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. मात्र, खंडपीठाच्या दैनिक कार्यसूचीत ही याचिका क्रमांक ३७ वर असल्याने प्रत्यक्ष सविस्तर सुनावणी होईल की केवळ पुढील तारीख दिली जाईल, याबाबत देशभरातील कायदेतज्ज्ञांमध्ये मतभेद दिसून येत आहेत.

विधिज्ञ असीम सरोदे यांनी ही सुनावणी शुक्रवारी होण्याची कोणतीही शक्यता नसल्याचा दावा केला आहे. कोर्टाने प्रस्तुत प्रकरणात अद्याप कोणतीही तारीख दिली नाही. या प्रकरणी ४ आठवड्यांनंतर एखाद्या दिवशी सुनावणी होईल, असे ते म्हणालेत. त्यांच्या या विधानामुळे शिवसेना खटल्याची सुनावणी शुक्रवारी होणार किंवा नाही याविषयी साशंकता निर्माण झाली आहे. शिवसेना व राष्ट्रवादीशी संबंधित या प्रकरणावर येत्या शुक्रवारी सुनावणी होण्याची शक्यता आहे. पण असीम सरोदे यांनी हा दावा



जोरकसपणे फेटाळला आहे. हे प्रकरण सतत लांबणीवर टाकले जात असल्यावर नाराजीही व्यक्त केली आहे. ते म्हणाले, आज सर्वोच्च न्यायालयातील सत्ता संघर्ष सुनावणी पुढे ढकलली जाणार हे मला कालच माहिती असल्याने मी आज दिल्लीला गेलो नव्हतो. शिवसेना सत्तासंघर्ष प्रकरणामध्ये कोणतीही नक्की तारीख दिलेली नाही. कुणीतरी पसरविले की २३ जानेवारी या तारखेला सुनावणी आहे. परंतु, ही शक्यता कमीच दिसते आहे, असे सरोदे म्हणाले.

## शिंदेंनी अचानक गाठली दिल्ली : भाजपच्या नेत्यांशी गुप्त भेटीगाठी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २१ :** मुंबई महापालिकेच्या महापौर पदावरून सत्ताधारी शिवसेना व भाजपमधील कथित तिढा अजून सुटला नाही. त्यातच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे अचानक दिल्ली दौऱ्यावर गेलेत. तिथे त्यांनी भाजपच्या ज्येष्ठ नेत्यांच्या भेटीगाठी घेऊन त्यांच्याशी संवाद साधल्यामुळे मुंबईतील सत्ता स्थापन करण्याचा तिढा लवकरच निकाली निघण्याची शक्यता आहे.

वृत्तानुसार, एकनाथ शिंदे मंगळवारी रात्री अचानक दिल्लीला पोहोचले. तिथे त्यांनी भाजपच्या उच्चपदस्थ नेत्यांची



भेट घेऊन महापौर व इतर समित्यांवर चर्चा केली. त्यांचा हा दौरा अत्यंत गुप्त होता. त्यांच्या दौऱ्यावरील मुंबईतील सत्ता स्थापनेच्या तिढ्यावर बरेच काही घडल्याचा दावा केला जात आहे.

## काका पुतण्याचा किंगमेकर फॉर्म्युला

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २१ :** राज्यातील महानगरपालिका निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्यानंतर राजकीय घडामोडींना वेग आला असून, मुंबई महानगरपालिकेत विशेषतः नवे समीकरण तयार होत असल्याचे चित्र दिसत आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे तीन नगरसेवक, शरद पवार गटाचा एक नगरसेवक आणि समाजवादी पक्षाचे दोन नगरसेवक मिळून सहा जणांची स्वतंत्र आघाडी स्थापन करण्याबाबत हालचाली सुरू आहेत.

ही आघाडी प्रत्यक्षात आल्यास महापालिकेतील सत्तेच्या गणितात महत्त्वाची भूमिका बजावू शकते. या सहा नगरसेवकांच्या गटाला स्थायी समितीमध्ये एक जागा, सुधार समितीमध्ये एक जागा आणि शिक्षण समितीमध्ये एक जागा मिळण्याची शक्यता आहे. याशिवाय इतर लहान समित्यांमध्येही या गटाला प्रतिनिधित्व मिळू शकते. त्यामुळे आकड्यांच्या खेळात या सहा जणांचे महत्त्व मोठ्या प्रमाणात वाढणार आहे.

निवडणुकीच्या काळात उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेसह लढलेली शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस, निकालानंतर मात्र अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या अधिक जवळ जात असल्याची चर्चा सुरू झाली आहे. निवडणुकीत एकमेकांविरोधात असलेले राष्ट्रवादीचे दोन गट आता महापालिकेतील सत्तासमीकरणात एकत्र येण्याची शक्यता वर्तवली जात असून, यामुळे मुंबईतील राजकारणाला नवे वळण मिळण्याची चिन्हे आहेत.

राजकीय विश्लेषकांच्या मते, ही संभाव्य आघाडी केवळ समित्यांपुरती मर्यादित राहणार नाही, तर भविष्यात मतदानाच्या निर्णायक क्षणी किंगमेकरची भूमिका बजावू शकते. महापौरपदाची निवड असो किंवा एखादा महत्त्वाचा ठराव, अशा वेळी या सहा नगरसेवकांनी कोणाला पाठिंबा द्यायचा, हे ठरवलं तर त्याचा थेट परिणाम सत्तासमीकरणावर होऊ शकतो.

## निवृत्त पीआयसह १० आरोपींना जन्मठेप

### किसनराव हुंडीवाले हत्याकांड : ५ आरोपींची निर्दोष मुक्तता

■ **महासागर प्रतिनिधी अकोला, दि. २१ :** गवळी समाजाचे प्रदेशाध्यक्ष किसनराव हुंडीवाले हत्याकांड प्रकरणाचा निकाल लागला आहे. अकोला जिल्हा सत्र न्यायालयाने बुधवारी (२१ जानेवारी) सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक श्रीराम गावंडे यांच्यासह १० आरोपींना जन्मठेपेची कठोर शिक्षा सुनावली. सबळ पुराव्याअभावी या प्रकरणातील इतर ५ आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.



किसनराव हुंडीवाले हे अकोल्यातील नामवंत व्यावसायिक आणि गवळी समाज संघटनेचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष होते. ६ मे २०१९ रोजी एका शैक्षणिक संस्थेच्या मालमत्तेच्या वादातून अकोल्यातील धर्मदाय आयुक्त कार्यालयात सुनावणीसाठी ते आले होते. दुपारी १२ वाजेच्या सुमारास कार्यालयाच्या परिसरातच भरदिवसा त्यांची अत्यंत क्रूरपणे हत्या करण्यात आली होती. या घटनेने संपूर्ण राज्य हादरले होते. या हत्याकांड प्रकरणी सिव्हिल लाईन पोलिस ठाण्यात एकूण १५ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.

शिक्षण संस्थेच्या मालकी वादातून किसनराव हुंडीवाले यांची हत्या झाल्याचे बोलले जात होते. हुंडीवाले आणि अकोल्यातील भाजप नेत्या आणि प्रथम महापौर सुमन गावंडेंच्या कुटुंबात हा वाद होता. या हत्या प्रकरणात मुख्य आरोपींमध्ये अकोल्यातील भाजपच्या पहिल्या महापौर सुमन गावंडे यांच्या कुटुंबातील ५ जणांचा समावेश होता. यामध्ये पती आणि निवृत्त पोलिस निरीक्षक श्रीराम गावंडे, मुलगा आणि भाजयुमोचा तत्कालिन प्रदेश उपाध्यक्ष विक्रम उर्फ छोटू गावंडे, रणजीत गावंडे, धीरज गावंडे, प्रल्हाद गावंडे, दिनेश राजपुत, प्रतीक तोंडे, विशाल तायडे, सतीश तायडे, मयूर अहिर, सूरज गावंडे यांचा समावेश आहे.

या संवेदनशील खटल्यात विशेष सरकारी वकील म्हणून ॲड. उज्वल निकम यांनी काम पाहिले. त्यांनी न्यायालयात मांडलेले पुरावे आणि प्रभावी युक्तिवाद यामुळे आरोपींना दोषी ठरवण्यात आले. न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर आज हा महत्त्वपूर्ण निकाल दिला.

किसनराव हुंडीवाले हे अकोल्यातील सुप्रसिद्ध प्रॉपर्टी ब्रोकर आणि व्यावसायिक होते. तसेच त्यांची अकोल्यातील कौलखेड, खडकी भागातील राजकारणावर पकड होती. त्यांच्याकडे गवळी समाज संघटनेचे प्रदेशाध्यक्ष देखील होते.

# बजाज पुणे ग्रँड टूरचा तिसरा टप्पा आज

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. २१ :** 'बजाज पुणे ग्रँड टूर-२०२६' अंतर्गत तिसऱ्या टप्प्याचे आयोजन गुरुवार, २२ जानेवारी २०२६ रोजी करण्यात आले आहे. हा टप्पा सासवड ते बारामती दरम्यान होणार असून, दुपारी १२:३० वाजता सासवड येथील नगरपरिषद, चंदन टेकडी येथून स्पर्धेला सुरुवात होईल. स्पर्धेचा शेवट बारामती येथील विद्या प्रतिष्ठान कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात होणार आहे.

या स्पर्धेमुळे सासवड आणि बारामती तालुक्यातील नागरिकांना देश-विदेशातील नामांकित सायकलपटूंचे कौशल्य जवळून पाहण्याची संधी मिळणार आहे. हा टप्पा सासवड आणि बारामती या दोन्ही तालुक्यांमधून जाणार असून, त्याची एकूण लांबी १३७.७ किलोमीटर आहे.




प्रशासनाने या मार्गावर संपूर्ण स्वच्छता राखण्यासाठी स्थानिक नागरिकांना विश्वासात घेऊन सूक्ष्म नियोजन केले आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी, नागरिक, गृहनिर्माण सोसायटी व गणेश मंडळाचे पदाधिकारी, महाविद्यालये (राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना), तसेच क्रीडा संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी प्रशासनासोबत सहकार्य करून स्पर्धा यशस्वी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

स्पर्धेचा टप्पा-३ सासवड येथून सुरू होऊन सुपे, पानवडी घाट, काळदरी (बोरी फाटा), मांढर, माहूर, परींचे, हरणी, वाल्हे, पिसुर्टी, नीरा, ब्राह्मणधरा, मुर्टी, मोरगाव, तरडोली, जळगाव क.प., कऱ्हावागज, खंडोबानगर, पिंपळी, लिमटेक, कन्हेरी, रुई रोड सावळ, वंजारवाडी या मार्गाने जाईल. अखेरीस बारामती येथील विद्या प्रतिष्ठान कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात स्पर्धेचा शेवट होईल.

पुणे ग्रँड चॅलेंज टूर-२०२६ आंतरराष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेच्या अनुषंगाने चौथ्या टप्प्याच्याअनुषंगाने पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील स्पर्धा मार्गावरील सर्व सरकारी व खाजगी शाळा २३ जानेवारी रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत सुरु ठेवाव्यात; त्यांनतर शाळा बंद करण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष जितेंद्र डूडी यांनी जारी केले आहेत.

टप्पा क्रमांक चार अंतर्गत छत्रपती शिवाजी स्टेडियम, बालेवाडी येथून स्पर्धेला सुरुवात होणार असून ती पुणे शहरहद्दीत जावून परत राजीव गांधी ब्रिजमार्गे पिंपरी चिंचवड आयुक्तालयाच्या हद्दीत प्रवेश करणार करुन ती पुणे शहर हद्दीत प्रवेश करणार आहे.

# महिला उमेदवाराला शून्य मत ईव्हीएमवर पुन्हा संशयाची छाया



| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण (महिला) | ६ | [illegible] गोविंद तिवारी | [illegible] जळगाव | अपक्ष | [illegible] | ३२७ |
| सर्वसाधारण (महिला) | ७ | [illegible] पाटील | प्लॉट नं.२०६, राधाकृष्ण [illegible] बजरंग [illegible] मागे, जळगाव | अपक्ष | दूरध्वनी | ७२९ |
| सर्वसाधारण (महिला) | ८ | फेगडे सुनंदा भागवत | गट नं [illegible] प्लॉट नं १ [illegible] जळगाव | अपक्ष | पुस्तक | ० |
| सर्वसाधारण | १ | खान जुनेद [illegible] | [illegible] मिल, सुरेशदादा जैन नगर, जळगाव | शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) | मशाल | २६६० |
| सर्वसाधारण | २ | फरदीन फिरोज पठाण | लक्ष्मी नगर, कानळदा रोड, जळगाव | शिवसेना | धनुष्यबाण | २६७० |
| सर्वसाधारण | ३ | [illegible] गोकुळ रमेश | प्लॉट नं.२०१, सी विंग, [illegible] अपार्टमेंट, [illegible] समोर, जळगाव | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | हात | १३२८ |

■ **जळगाव :** जळगाव महानगरपालिका निवडणुकीत एका घटनेमुळे ईव्हीएमचा वाद पुन्हा एकदा केंद्रस्थानी आला आहे. प्रभाग क्रमांक १-अ मधून अपक्ष म्हणून निवडणूक लढवलेल्या सुनंदा भागवत फेगडे या महिला उमेदवाराला थेट ० म्हणजेच शून्य मते मिळाल्याचे निकालात समोर आले. या निकालाने केवळ जळगावच नव्हे, तर संपूर्ण राज्यातील राजकीय वर्तुळात चर्चेचा भडका उडाला आहे. सुनंदा फेगडे यांचा साधा, पण थेट प्रश्न आहे मी स्वतःला तरी मतदान केलं नव्हतं का? घरातील लोकांनी मतदान केलं की नाही, हा वेगळा मुद्दा असू शकतो; मात्र स्वतः उमेदवाराने स्वतःला दिलेलं मतही निकालात शून्य कसं दिसू शकतं, याचं उत्तर कोण देणार? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. मत ईव्हीएममध्ये जातं की निकाल थेट भाजपकडे जातो, असा टोला लगावत त्यांनी निवडणूक आयोगाच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केलं.

आयोग शांत राहतो आणि स्पष्टीकरण मात्र सत्ताधारी पक्षाकडून येतं, ही बाब लोकशाहीसाठी चिंताजनक असल्याचे त्या म्हणाल्या. एश्ट सरकारी आहे, निवडणूक आयोग घटनात्मक आहे; पण खुलासा पक्षीय पातळीवरून दिला जातो–ही आजच्या लोकशाहीची शोकांतिका आहे, असे त्यांनी ठामपणे नमूद केले.

# शिंदेंच्या खेळीने भाजपची गणितं बिघडली...

# स्वबळावर सत्ता, तरीही कोंडी!

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २१ :**
नाशिक महापालिकेत भाजप स्वबळावर सत्तेच्या उंबरठ्यावर असतानाच, राज्याच्या राजकारणात एक वेगळाच तणाव निर्माण झाला आहे. एका बाजूला नाशिकमध्ये स्पष्ट बहुमत, तर दुसऱ्या बाजूला मुंबईच्या महापौरपदावर अडलेली गणितं, या दोन टोकांमधून पुढील आठवडाभरात मोठ्या राजकीय घडामोडी घडण्याची दाट शक्यता व्यक्त केली जात आहे. शिंदे गटाच्या पॉवरपॉलिटिक्समुळे भाजपची कोंडी होत असल्याचे चित्र सध्या दिसत आहे.



नाशिक महापालिका निवडणुकीत भाजपला तब्बल ७२ जागा मिळाल्या आहेत. महापौर, उपमहापौरांसह सत्तेची सर्व प्रमुख पदे स्वबळावर मिळवण्याइतका हा आकडा पुरेसा आहे. त्यामुळे नाशिकमध्ये भाजप स्वतंत्रपणे सत्ता स्थापण्याच्या तयारीत असून, या रणनीतीची सूत्रे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्या हाती असल्याचे मानले जाते.

याच नाशिकमध्ये शिंदेसेनेला २९ जागांवर समाधान मानावे लागले आहे. बहुमताचा आकडा भाजपकडे असल्याने, शिंदे गटाला विरोधी बाकावर बसावे लागण्याची वेळ येऊ शकते. मात्र, हीच शक्यता शिंदे गटातील नगरसेवकांच्या अस्वस्थतेला कारणीभूत ठरत आहे.

निवडणुकीच्या तोंडावर शिवसेना शिंदे गटाने अनेक माजी नगरसेवकांना सत्तेत सहभागाची आश्वासने दिली होती. त्या आश्वासनांवर विश्वास ठेवून अनेकांनी पक्षात प्रवेश केला.

आता सत्ता दूर गेल्यास या नगरसेवकांची राजकीय कोंडी होण्याची भीती वाढली आहे. ही अस्वस्थता लक्षात घेऊन स्थानिक नेत्यांनी थेट वरिष्ठ पातळीवर सत्तेत सहभागी होण्याची मागणी सुरू केली आहे.

दुसरीकडे, मुंबई महापालिकेतील महापौरपदाची लढत भाजपसाठी निर्णायक ठरत आहे. येथे भाजपला शिंदे गटाच्या पाठिंब्याशिवाय सत्ता स्थापणं अवघड असल्याचे वास्तव आहे. हीच कमकुवत जागा ओळखून शिंदे गटाने दबावतंत्र अवलंबल्याचे चित्र आहे.

मुंबईत साथ द्यायची, तर नाशिक, पुणे आणि इतर महापालिकांमध्ये सत्तेत वाटा द्या, असा अप्रत्यक्ष संदेश दिला जात असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

या पार्श्वभूमीवर नाशिकमध्येही शिंदे गट काही पदांवर आग्रह धरण्याची शक्यता नाकारता येत नाही. स्वबळावर सत्ता असतानाही भाजपला भागीदारीचा विचार करावा लागतोय, हेच या खेळीचं वैशिष्ट्य ठरत आहे.

दरम्यान, बुधवारी नाशिक महापालिकेच्या महापौर पदासाठी काढण्यात येणाऱ्या कायदेशीर सोडतीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. आज गटनोंदणी आणि आघाड्यांचे अंतिम चित्र स्पष्ट होणार असून, त्यावरच महापौर व उपमहापौर पदांचे राजकीय गणित ठरणार आहे. या प्रक्रियेत शिंदे गट वाटा मागून भाजपची डोकेदुखी वाढवेल का, याकडे लक्ष लागले आहे.

# तर धक्का बसला असता!

## सुषमा अंधारेंची उपरोधीक टीका

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २१ :**
शिवसेनेच्या सत्तासंघषार्ची सुप्रीम कोर्टातील आजची सुनावणी पुन्हा लांबणीवर टाकण्यात आली. ही सुनावणी परवा म्हणजे शुक्रवारी २३ जानेवारी रोजी होणार असल्याची माहिती आहे.



पण विधिज्ञ असीम सरोदे यांनी ही सुनावणी शुक्रवारी होण्याची कोणतीही शक्यता नसल्याचा दावा केला आहे. आता शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी देखील ट्विट करत म्हटले की, माननीय सर्वोच्च न्यायालयाने अपेक्षेप्रमाणे तारीख पुढे ढकलल्याबद्दल जाहीर आभार! असे म्हणत टीका केली आहे.

सुषमा अंधारे यांनी मंगळवारी देखील या प्रकरणी ट्विट करत म्हटले होते की, ३७ नंबरचे मॅटर कधी बोर्डावरच येणार नाही. आपण भाबडा आशावाद सोडूया आणि ताकदीने लढू या, असे ट्विट त्यांनी केले होते. तसेच आज पुन्हा ट्विट करत त्यांनी या प्रकरणी म्हटले की, आज सुनावणी झाली असती तर मात्र धक्का बसला असता.

हे प्रकरण आज कोर्टात ३७ व्या क्रमांकावर लिस्टेड होते. त्यावर सकाळच्या सत्रात सुनावणी सुरू होऊन ती सलग २ दिवस चालणे अपेक्षित होते. पण आज अचानक कोटार्पुढे अरावली पर्वतरांगांचे प्रकरण आले कोर्टाने सुनावणी पुढे ढकलली.

# सावंत कुटुंबात उघड फूट

■ **सोलापूर :** जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना शिंदे गटाचे ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री आमदार तानाजी सावंत यांच्या कुटुंबात मोठी राजकीय दरी निर्माण झाल्याचं स्पष्ट झालं आहे.



सावंत कुटुंबातील दोन महत्त्वाच्या व्यक्ती आमदार तानाजी सावंत यांचे बंधू शिवाजी सावंत आणि पुतणे धनंजय सावंत यांनी भाजपमध्ये अधिकृत प्रवेश केल्याने जिल्ह्यातील राजकारणात खळबळ उडाली आहे. हा प्रवेश केवळ पक्षांतरापुरता मर्यादित न राहता, सावंत कुटुंबातील अंतर्गत मतभेद उघड करणारा ठरला आहे. विशेषतः जिल्हा परिषद निवडणुकीच्या तोंडावर हा राजकीय भूकंप झाल्याने शिंदे गटासाठी ही बाब चिंतेची ठरू शकते. इतकेच नाही तर त्यांना जिल्हा परिषदेची उमेदवारी देखील जाहीर झाली आहे.

काही काळापासून सावंत कुटुंबात राजकीय मतभेद असल्याची चर्चा सुरू होती. जिल्हा परिषद निवडणुकीसाठी धनंजय सावंत यांनी स्वतंत्र मोचेबांधणी सुरू केल्यानंतर आमदार तानाजी सावंत आणि त्यांच्यातील दुरावा स्पष्टपणे समोर आला होता.

धनंजय सावंत यांनी विविध ठिकाणी कार्यकर्त्यांच्या स्वतंत्र बैठका घेतल्या, प्रचाराची दिशा ठरवली आणि स्थानिक नेतृत्वाशी थेट संवाद साधला. या बैठकींसाठी लावण्यात आलेल्या बॅनरवर आमदार तानाजी सावंत यांचा फोटो नसल्याने चर्चांना उधाण आलं होतं.

दरम्यान, सावंत कुटुंबातील हा वाद आता वेगळ्याच दिशेने वळल्याचं दिसून येत आहे. धनंजय सावंत हे भाजपच्या संपर्कात असल्याच्या चर्चा रंगत होत्या. अखेर धनंजय सावंत यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे.

# धनंजय मुंडेंवर गुन्हा दाखल करा

## कृषी घोटाळा प्रकरण : अंजली दमानियांची मागणी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २१ :** माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्या कार्यकाळातील कथित कृषी टेंडर घोटाळ्याप्रकरणी आज लोकायुक्त कार्यालयात अत्यंत महत्त्वाची आणि खळबळजनक सुनावणी पार पडली.

सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी सुमारे एक तास लोकायुक्तांपुढे या प्रकरणाची सविस्तर बाजू मांडली.



या घोटाळ्याशी संबंधित आयएएस अधिकारी व्ही. राधा यांचा चौकशी अहवाल धनंजय मुंडे यांच्या कार्यालयातून गायब झाल्याचा धक्कादायक दावा करत, याप्रकरणी मुंडे यांच्यावर थेट एफआयआर (त्रक्षक्र) दाखल करण्याची लेखी मागणी दमानिया यांनी केली आहे. यासंदर्भात अंजली दमानिया यांनी सोशल मीडिया पोस्ट करत माहिती दिली.

अंजली दमानिया यांनी आपल्या सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हटले की, लोकायुक्त कार्यालयात आज सकाळी ११ वाजता माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्या कृषी घोटाळ्यावर महत्वपूर्ण सुनावणी झाली. जीव ओतून, जवळजवळ एक तास मी सगळी केस लोकायुक्तांपुढे मांडली.

कृषी टेंडर घोटाळ्यात, आयएएस अधिकारी व्ही राधा यांनी एक महत्वपूर्ण अहवाल बनवला होता. तो अहवाल व्ही राधा यांनी, धनंजय मुंडे यांच्या कार्यालयात पाठवला, आणि हाच चौकशी अहवाल गायब झाल्याचे कृषी विभागाने लेखी मान्य करून, तसे पत्र मला दिले आहे.

सरकारी फाईलची चोरी, पुरावे दडपण्याचा गंभीर प्रकार आहे. भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यानुसार एफआयआर करण्याचा पूर्ण अधिकार लोकायुक्तांना आहे आणि हा एफआयआर त्यांनी दाखल करावा अशी लेखी मागणी मी लोकायुक्तांकडे केली. ही तक्रार माननीय लोकायुक्तांनी रेकॉर्डवर घेतली. (ही तक्रार मी जोडली आहे व ह्याच बरोबर, मी कृषी विभागाकडून असलेले पत्र देखील जोडले आहे).

धनंजय मुंडे यांच्या वकिलांना लोकायुक्तांनी २१ ऑगस्टला आदेश दिले होते की, त्यांचे म्हणणे त्यांनी लिखित स्वरूपात २ आठवड्यात सादर करावे. पण तब्बल ५ महिने उशिराने त्यांनी ते उत्तर, आज सादर केले व नुसतीच माफी मागितली.

ह्यावरून त्यांना कायद्याची भीती नाही हे स्पष्ट होते, असेही अंजली दमानिया यांनी म्हटले आहे. पुढील सुनावणी १८ फेब्रुवारी ला ठेवण्यात आली असल्याची माहिती दमानिया यांनी दिली.

# मनसेच्या नगरसेवकांचा शिंदेंच्या शिवसेनेला पाठिंबा

## केडिएमसीत ट्विस्ट

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २१ :**
कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या निकालानंतर सत्तास्थापनेसाठी 'हायव्होल्टेज' ड्रामा सुरू झाला आहे. ६२ या बहुमताच्या आकड्यापर्यंत पोहोचण्यासाठी फोडाफोडीच्या राजकारणाने टोक गाठले असून, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला राज ठाकरे यांच्या मनसेकडून पाठिंबा देण्यात आला आहे. शिंदेंच्या शिवसेनेने भाजप आणि ठाकरे गटाला धक्का देत, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेवर सत्ता स्थापनेसाठी एक पाऊल पुढे टाकले आहे.

काही दिवसांपासून मनसे आणि शिंदेंच्या शिवसेनेच्या युतीच्या चर्चा सुरु होत्या. मात्र, आजपर्यंत त्याबाबत कोणत्याही पक्षाने अधिकृत भाष्य केले नव्हते. मात्र, आज बुधवारी मनसेचे ५ आणि एकनाथ शिंदे यांचे ५३ नगरसेवक एकाचवेळी गट नोंदणीसाठी कोकण विभागीय आयुक्तांच्या कार्यालयात पोहोचले होते. यावेळी मनसेचे ५ आणि एकनाथ शिंदे यांचे ५३ नगरसेवकांनी गट देखील स्थापन केला.

मंगळवारी रात्री उशिरा शिंदेसेनेचे खासदार श्रीकांत शिंदे आणि मनसेचे राजू पाटील यांची बैठक झाली होती. या बैठकीत कल्याण डोंबिवली महापालिकेत सत्तास्थापनेचे आणि महापौर पदाची सूत्रे ठरली आहेत. त्यानंतर आज कोकण आयुक्त कार्यालयात श्रीकांत शिंदे, नरेश म्हस्के, राजू पाटील यांचा एकत्रित फोटो समोर आला. हा फोटो सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. खासदार श्रीकांत शिंदे यांनी मनसेने शिंदे सेनेला पाठिंबा दिल्याचे सांगितले.



खासदार श्रीकांत शिंदे आणि मनसेचे नेते राजू पाटील यांच्यात कोकण भवन येथे बैठक झाली. खासदार श्रीकांत शिंदे आणि मनसेचे नेते राजू पाटील यांच्यात कोकण भवन येथे बैठक झाली.

याबाबत शिंदेसेनेचे खासदार श्रीकांत शिंदे म्हणाले की, आज ५३ नगरसेवकांसह आम्ही गट नोंदणी करायला आलोय. कल्याण डोंबिवलीत महायुतीसोबत मनसे आल्याने आमची ताकद वाढली आहे. याठिकाणी शिवसेना-भाजपा-मनसे एकत्रित येऊन महायुती सत्ता स्थापन करणार आहोत. विकासासाठी जे आमच्या सोबत येतील त्यांचे स्वागत आहे. ठाकरे सेनेने पाठिंबा दिला तरीही त्यांचे स्वागत आहे.

उल्हासनगरमध्येही वंचित बहुजन आघाडीचे २ नगरसेवक यांनी आम्हाला पाठिंबा दिला आहे. तिथे जो मॅजिक फिगर आहे तो शिवसेनेने पार केला आहे. महाराष्ट्रात महायुती म्हणून निवडणूक लढलो तिथे महायुतीचा महापौर बसेल.

**मनसेची प्रतिक्रिया काय?**

या विषयासंदर्भात मनसेची प्रतिक्रिया समोर आली आहे. मनसेचे प्रवक्ते संदीप देशपांडे यांनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना म्हटले की, युती-आघाडी करण्याचे अधिकार राज ठाकरे यांनी स्थानिक नेतृत्वाला दिले आहेत. स्थानिक राजकीय गणिते आणि परिस्थितीनुसार स्थानिक नेतृत्वाने सदर निर्णय घेतला असावा. तसेच शिवसेनेबरोबर (ठाकरे) युती झाल्यानंतर ज्याठिकाणी मनसेचे उमेदवार उभे राहिले होते, अशा आठ ठिकाणी ठाकरे गटाकडून त्यांच्या उमेदवारांना एबी फॉर्म देण्यात आले होते. हे एबी फॉर्म त्यांनी द्यायला नको होते, असेही संदीप देशपांडे म्हणाले.

**भाजपची भूमिका काय?**

भाजपचे माध्यम प्रमुख आणि प्रवक्ते नवनाथ बन यांनी देखील मनसेने शिंदेसेनेला दिलेल्या पाठिंब्यासंदर्भात प्रतिक्रिया दिली आहे. महायुती म्हणून आम्ही निवडणूक लढवली. मनसेने पाठिंबा दिला तर स्वागतच आहे. महाराष्ट्रात भाजप महायुतीचा झेंडा फडकणार विधानसभेला आम्ही सोबत होतो. मनसे हिंदुत्ववादी विचारांची पार्टी आहे. त्या विचारधारेवर महायुतीला पाठिंबा देत असतील, तर वाईट वाटण्याचं कारण नाही, अशी भूमिका नवनाथ बन यांनी मांडली.

# हिंगोलीच्या कन्येची 'गिनीज वर्ल्ड बुक'मध्ये नोंद

## सलग पाच तास सत्र चालविणाऱ्या एकमेव त्वचारोग तज्ज्ञ

■ **वृत्तसंस्था, हिंगोली, दि. २१ :**
डिकन्स्ट्रक्टच्या डर्माथॉनमध्ये ऑनलाईन झुम प्लॅटफॉर्मवर आयोजित केलल्या डर्माथॉन कार्यक्रमात हिंगोलीच्या डॉ. राशी सोनी यांनी सलग पाच तास सत्र चालवून तब्बल सात ते आठ हजार लोकांनी विचारलेल्या प्रश्नांवर शंका समाधान केले. सलग पाच तास सत्र चालविणाऱ्या त्या एकमेव त्वचारोग तज्ञ ठरल्या असून त्यांची गिनीज वर्ल्ड बुकमध्ये नोंद झाली आहे. त्याबद्दल त्यांना नुकतेच प्रमाणपत्र देखील देण्यात आले आहे.

डिकन्स्ट्रक्ट या आघाडीच्या स्किनकेअर ब्रँडतर्फे काही दिवसांपुर्वीच झूम प्लॅटफॉर्मवर २४ तास ४५ मिनिटांच्या सलग लाईव्ह डर्माथॉन कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमात प्रत्येक तासात कोणत्या विषयावर आरोग्य सल्ला दिला जाणार आहे याची माहिती देण्यात आली होती. या कार्यक्रमात दिल्ली, मुंबई, बंगळुरू, पुणे या भागातील सुमारे २४ तज्ञांनी यामध्ये सहभाग नोंदविला होता.

या डर्माथॉनमध्ये हिंगोलीच्या त्वचारोगतज्ञ डॉ. राशी सोनी यांनी विशेष ठसा उमटवला. या संपूर्ण उपक्रमात सलग पाच तास सत्र चालवणाऱ्या एकमेव त्वचारोग तज्ञ ठरल्या आहेत. या पाच तास-ांच्या कालावधीत त्यांनी मुरुम (ॲक्ने), केस गळणे, हार्मोनल त्वचा समस्या, दैनंदिन स्किनकेअरबाबतचे गैरसमज अशा अनेक सामान्य पण महत्त्वाच्या विषयांवर सखोल माहित दिली. या शिवाय झूमवर थेट उपस्थित असलेल्या सुमारे ७ हजार प्रेक्षकांचे प्रश्न त्यांनी अत्यंत सोप्या आणि वैद्यकीय दृष्टिकोनातून उत्तर देत त्यांच्या शंकांचे समाधान केले.




रुग्ण-केंद्रित संवादशैली, सातत्यपूर्ण उपस्थिती आणि विश्वासार्ह वैद्यकीय मार्गदर्शन यामुळे डॉ. राशी सोनी यांचा सहभाग हा डर्माथॉनचा एक प्रमुख आकर्षण ठरला.

झूम ॲपद्वारे सलग पाच तास वैद्यकिय सल्ला देणाऱ्या डॉ. सोनी यांची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झाली आहे. त्यांच्या नोंदी बद्दल त्यांना नुकतेच प्रमापणत्र देखील देण्यात आले आहे. त्यांच्या कामगिरीमुळे देशाच्या आरोग्य क्षेत्रात हिंगोलीचे नाव झळकले आहे.

**यशाचा आनंद - डॉ. राशी सोनी**

डिकन्स्ट्रक्टद्वारे आयोजित करण्यात आलेला हा डर्माथॉन केवळ एक विक्रमी कार्यक्रम नसून, डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून त्वचा व केसांच्या आरोग्याविषयी योग्य माहिती जनतेपर्यंत पोहोचवण्याचा एक प्रभावी प्रयत्न ठरला आहे. या कार्यक्रमात मिळविलेले यश अन हिंगोलीचे नांव उंचावल्या बद्दल आनंद होत आहे.

# हफ्ता थांबला...दिलासा मिळणार?

## लाडकी बहीण योजनेवर सरकारचा नवा निर्णय

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २१ :**
मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांसाठी दिलासादायक घडामोड समोर आली आहे.

ई-केवायसी प्रक्रियेत झालेल्या चुकांमुळे गेल्या महिन्यात हफ्ता न मिळालेल्या हजारो महिलांच्या तक्रारींची राज्य सरकारने गंभीर दखल घेतली असून, आता थेट क्षेत्रीय पातळीवर पडताळणी करण्याचे आदेश प्रशासनाला देण्यात आले आहेत. त्यामुळे डिसेंबरचा हफ्ता अडकलेल्या महिलांसाठी आशेचा किरण निर्माण झाला आहे.

लाडकी बहीण योजनेअंतर्गत लाभ घेण्यासाठी ई-केवायसी अनिवार्य करण्यात आली होती. त्यासाठी ३१ डिसेंबर २०२५ ही अंतिम मुदत देण्यात आली होती. मात्र, अनेक लाभार्थी महिलांकडून ई-केवायसी करताना चुकीचा पर्याय निवडला गेल्याने तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या. परिणामी, या महिलांना डिसेंबर महिन्याचा हफ्ता मिळू शकलेला नाही.

हफ्ता न मिळाल्याच्या तक्रारी राज्यभरातून मोठ्या प्रमाणावर येऊ लागल्यानंतर महिला आणि बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांनी या विषयात लक्ष घातले आहे. त्यांनी प्रशासनाला स्पष्ट सूचना देत, ई-केवायसीमध्ये अडचण आलेल्या लाभार्थ्यांची प्रत्यक्ष पडताळणी करण्याचे आदेश दिले आहेत.

ही पडताळणी अंगणवाडी सेविकांमार्फत करण्यात येणार असून, खरे लाभार्थी महिलांना योजनेपासून वंचित राहावे लागू नये, यावर सरकारचा भर असल्याचे दिसून येत आहे.

# पक्ष, पैसा आणि प्रचार!

■ **विशेष प्रतिनिधी**
**नवी दिल्ली, दि. २१ :**
राजकारणात सत्ता दिसते व्यासपीठावर, पण तिची खरी ताकद दडलेली असते तिजोरीत. भारतीय निवडणूक आयोगाकडे सादर करण्यात आलेल्या ताज्या आर्थिक अहवालातून भाजपाच्या आर्थिक सामर्थ्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. कोट्यवधींच्या देणग्या, हजारो कोटींचा खर्च आणि भक्कम रोख साठा, या आकड्यांनी भाजपच्या आर्थिक यंत्रणेची व्याप्ती स्पष्ट केली आहे.

या अहवालामुळे केवळ आकडे समोर आलेले नाहीत, तर निवडणूक जिंकण्यामागची आर्थिक रणनितीही अधोरेखित झाली आहे. विशेष म्हणजे, पक्षाचे नवे राष्ट्रीय नितीन नबीन यांच्याकडे आता या प्रचंड निधीच्या नियोजनाची आणि वापराची सूत्रे असणार आहेत.

**पक्षाच्या तिजोरीत किती रोख?**

भाजपने सादर केलेल्या वार्षिक लेखापरीक्षण अहवालानुसार, पक्षाकडे रोख रक्कम आणि बँक ठेवी मिळून सुमारे १०,००० कोटी रुपयांची संपत्ती आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षात भाजपच्या खात्यात २,८८२.३२ कोटी रुपयांची वाढ नोंदवण्यात आली.

३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाअखेर पक्षाचा सामान्य निधी तब्बल १२,१६४ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. याच कालावधीत मागील वर्षी हा आकडा ९,१६९ कोटी रुपयांपर्यंतच मर्यादित होता.

**सत्तेची लढाई, खर्चाची उधळण**

दिल्लीतील आम आदमी पक्ष आणि ओडिशातील बिजू जनता दल यांना सत्तेपासून दूर करण्यात यश मिळाल्यानंतर भाजपच्या निवडणूक मोहिमेचा खर्च जवळपास दुप्पट झाला आहे. मागील वर्षी जिथे हा खर्च १,७५४.०६ कोटी रुपये इतका होता, तिथे यंदा तो थेट ३,३३५.३६ कोटी रुपयांपर्यंत गेला आहे.

अहवालानुसार पक्षाचा ८८.३६ टक्के खर्च हा थेट निवडणूक-संबंधित कामांवर झालेला आहे. म्हणजेच भाजपसाठी निवडणूक ही केवळ राजकीय प्रक्रिया नसून, ती आर्थिक गुंतवणूक असल्याचे स्पष्टपणे दिसते.

**देणग्यांचा वर्षाव**

भाजपच्या उत्पन्नात सर्वात मोठा वाटा देणग्यांचा आहे. २०२४९२५ या वर्षात पक्षाला ६,१२५ कोटी रुपयांच्या देणग्या प्राप्त झाल्या आहेत. मागील वर्षी हाच आकडा ३,९६७ कोटी रुपये होता. म्हणजेच एका वर्षात देणग्यांमध्ये सुमारे २,१५० कोटी रुपयांची वाढ झाली आहे.

याशिवाय, भाजपकडे ९,३९० कोटी रुपयांच्या मुदत ठेवी असून, त्यावरून बँकांकडून ६३४ कोटी रुपयांचे व्याज मिळाले आहे. पक्षाने ६५.९२ कोटी रुपयांचा आयकर परतावा दाखल केला असून, त्यावरून ४.४० कोटी रुपयांचे व्याजही प्राप्त झाले आहे.

एकूण ३,३३५.३६ कोटी रुपयांच्या खर्चात, ३१२.९ कोटी रुपये उमेदवारांना थेट आर्थिक सहाय्यासाठी, ५८३ कोटी रुपये हवाई आणि हेलिकॉप्टर प्रवासावर १,१२५ कोटी रुपये इलेक्ट्रॉनिक माध्यमांतील प्रचारासाठी, १०७ कोटी रुपये कटआउट्स, होर्डिंग्ज आणि बॅनरवर, ८९७ कोटी रुपये जाहिरातींवर, ९०.९३ कोटी रुपये प्रचार साहित्य आणि रॅलींसाठी, ५१.७२ कोटी रुपये सभांसाठी खर्च करण्यात आले आहेतण

यांवरून भाजपची मोहीम अत्यंत महागडी आणि नियोजनाने चालवली जाते, हे स्पष्ट होते.

# महाराष्ट्रातील दोन दिग्गजांवर निर्णायक जबाबदारी

## भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षांचा पहिलाच पॉवर मुव्ह

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २१ :**
भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी सूत्रे हाती घेतताच नितीन नबीन यांनी पक्षात हालचाल निर्माण करणारा मोठा निर्णय घेतला आहे. देशातील आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संघटनात्मक बांधणी आणि रणनिती अधिक धारदार करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्रातील दोन बड्या नेत्यांवर महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सोपवण्यात आल्या आहेत. या निर्णयामुळे भाजपमध्ये नव्या नेतृत्वशैलीचे संकेत मिळत असून, निवडणूकपूर्व राजकीय गणितेही वेगाने बदलू लागली आहेत.

बिहारमधील बांकीपूर मतदारसंघातून चार वेळा आमदार राहिलेले आणि राज्य मंत्रिमंडळात विविध खात्यांचा कार्यभार सांभाळलेले नितीन नबीन यांनी काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत राष्ट्रीय अध्यक्षपदाचा औपचारिक पदभार स्वीकारला. पदभार स्वीकारल्यानंतर अवघ्या काही तासांतच त्यांनी संघटनात्मक फेररचना करत पक्षाला निवडणूक मोडमध्ये आणण्याचा स्पष्ट संदेश दिला.

या निर्णयांनुसार केरळ विधानसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्रातील भाजपचे ज्येष्ठ नेते विनोद तावडे यांची प्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे, तर शोभा करंदलाजे यांच्याकडे सहप्रभारीची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. दक्षिण भारतातील भाजपसाठी महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या केरळमध्ये संघटन मजबूत करण्यासाठी अनुभवी नेतृत्वावर विश्वास टाकण्यात आला आहे, याचे संकेत या नियुक्तीतून मिळतात.

याशिवाय चंदीगड महापौर पदाच्या निवडणुकीसाठीही विनोद तावडे यांनाच



प्रभारी म्हणून नेमण्यात आले आहे. स्थानिक पातळीवर चुरशीच्या ठरणाऱ्या या निवडणुकीत भाजपची पकड भक्कम करण्यासाठी राष्ट्रीय नेतृत्वाने तावडे यांच्या अनुभवावर भर दिल्याचे दिसते.

महाराष्ट्रातील आणखी एक प्रभावी चेहरा म्हणजे मंत्री आणि मुंबईतील भाजप नेते ॲड. आशिष शेलार. त्यांची नियुक्ती तेलंगणामधील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी निवडणूक प्रभारी म्हणून करण्यात आली आहे. उत्तर-दक्षिण असा राजकीय अनुभव असलेल्या शेलार यांच्या खांद्यावर तेलंगणातील जबाबदारी देत भाजपने महाराष्ट्रातील नेतृत्वावरचा विश्वास पुन्हा अधोरेखित केला आहे.

दरम्यान, बंगळूर महापौर पदाच्या निवडणुकीसाठी राम माधव, सतीश पुनिया आणि संजय उपाध्याय यांच्यावर जबाबदारी सोपवण्यात आली आहे. आगामी काळात विविध राज्यांमध्ये होऊ घातलेल्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही संघटनात्मक फेररचना करण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे.

नितीन नबीन रांची येथील रहिवासी आहेत. त्यांचे वडील नवीन किशोर प्रसाद सिन्हा हेही भाजपचे आमदार होते. नितीन नबीन यांची आता भाजपाचे १२ वे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून निवड झाली आहे.

# ९ वर्षांच्या विद्यार्थिनीवर ८ महिने अत्याचार

■ **वृत्तसंस्था, नाशिक, दि. २१ :**
इगतपुरी तालुक्यातील घोटी पोलिस ठाणे हद्दीतील करंजवाडी (अडसरे बु.) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतीलच एका शिक्षकाने तिसरीत शिकणाऱ्या ९ वर्षांच्या विद्यार्थिनीवर तब्बल सात ते आठ महिने लैंगिक अत्याचार केला.

एवढेच नव्हे तर हा प्रकार कुणाला सांगितल्यास जिवे मारण्याची धमकीही दिली. याप्रकरणी पीडितेच्या आईने घोटी पोलिस ठाण्यात सविस्तर तक्रार दाखल केली.

शिक्षक रामचंद्र मनाजी कचरे (५५) याच्याविरोधात गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली. मंगळवारी त्याला कोर्टाने २४ जानेवारीपर्यंत चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

# निलेश बदूकले हत्याकांडात आणखी दोन आरोपी अटक

## रेकी करुन योजनाबध्दरित्या हत्या झाल्याचे निष्पन्न



**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर बाजार,(दि.21)**– मुरुम व्यावसायिक निलेश बदूकले हत्याकांडात पोलिसांनी धक्कादायक खुलासा करित आणखी दोन आरोपींना अटक केली. हे दोन्ही आरोपी बदूकले दाम्पत्याची रेकी करित मारेकरी अजय लंगोटे यांना माहिती पुरवित होते.

पोलिसांनी 20 तारखेला रात्री उशिरा गोलुराम उर्फ संजय भुजंगराव लंगोटे (वय 40, रा. थुगाव पिंपरी) आणि पवन विकासराव झटले (वय 23, रा. शिरजगाव बंड) नामक दोन आरोपींना अटक केली. सर्व तांत्रिक पुरावे आणि आरोपींच्या कबुली जबाबांच्या आधारे यांना अटक करण्यात आली आहे.

पोलिसांनी या हत्याकांडातील मुख्य आरोपी अजय लंगोटे याचा भाऊ गोलुराम उर्फ संजय लंगोटे याला ताब्यात घेऊन चौकशी केली. प्रारंभी त्यानेही माहिती देण्यास टाळाटाळ केली. मात्र, मोबाईल कॉल रेकॉर्डच्या आधारे पवन विकासराव झटले याला विश्वासात घेऊन विचारपूस केली



मृतक निलेश बदुकले

असता, त्याने धक्कादायक माहिती दिली. गोलुराम लंगोटे याने मृतक निलेश बदूकले यांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्याची जबाबदारी आपल्याला दिली होती. घटनेच्या दिवशी बदूकले मॉर्निंग वॉकसाठी बाहेर पडल्याची माहिती आपण गोलुरामला दिली, ही माहिती पुढे अजय लंगोटेपर्यंत पोहोचविण्यात आली आणि त्यानंतरच हत्या घडवून आणण्यात आली, असे पवनने पोलिसांसमोर कबूल केले. ही संपूर्ण कारवाई अमरावती जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अप्पर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, अचलपूर उपविभागाचे सहाय्यक पोलीस अधीक्षक डॉ. शुभम कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरण वानखडे, चांदूर बाजारचे ठाणेदार अशोक जाधव, दुय्यम ठाणेदार उल्हास राठोड, तसेच स्थानिक गुन्हे शाखा व चांदूर बाजार पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संयुक्तपणे ही कारवाई यशस्वी केली.

### व्यावसायिक स्पर्धेतून वाढला वाद

निलेश बदूकले, अजय लंगोटे आणि त्यांचा भाऊ गोलुराम उर्फ संजय हे तिघेही मुरूम व्यवसायात कार्यरत होते. मृतक निलेश बदूकले सन 2012 पासून महाराष्ट्र–मध्यप्रदेश सीमेवरून मुरूम काढून त्याची विक्री करण्याचा व्यवसाय करीत होते. त्यांच्या व्यवसायाला चांगली मागणी आणि सातत्याने वाढ मिळत होती. काही वर्षांनंतर अजय व गोलुराम लंगोटे यांनीही याच व्यवसायात प्रवेश केला. मात्र, त्यांचा व्यवसाय अपेक्षेप्रमाणे चालला नाही. बदूकले यांचा व्यवसाय झपाट्याने वाढत असताना लंगोटे बंधूंची घसरण होत होती. यामुळे दोन्ही पक्षांत वारंवार वाद होत होते. व्यवसायात पिछाडीवर पडल्याने आणि स्पर्धेत टिकू न शकल्याने लंगोटे बंधू हताश झाले होते. पवन झटले हा काही महिन्यांपूर्वी लंगोटे यांच्या ट्रॅक्टरवर गिट्टी–मुरूम वाहतुकीचे काम करत होता. या काळातच हा कट हळूहळू रचण्यात आल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. तपासात असे समोर आले की, बदूकले यांना व्यवसायातून बाजूला काढण्याचा विचार त्यांनी आधीपासूनच केला होता. परंतु बदूकले यांचा व्यवसाय दिवसेंदिवस अधिकच फोफावत गेल्याने अखेर त्यांनी थेट त्यांचा काटा काढण्याचा निर्णय घेतला. स्पर्धेतून मार्ग काढण्यासाठी रचलेला हा खुनाचा कट प्रत्यक्षात उतरवण्यात आल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे.

# आज सोडत, अमरावतीची सत्ता कुणाच्या हाती?

### महापौरपदाच्या आरक्षणाचा कौल ■ एक चिठ्ठी सोडविणार गणिते

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,(दि.21)**– अमरावती महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीचा निकाल लागून काही दिवस झाले असले, तरी शहराची सत्ता अजूनही अधांतरीच आहे. कारण 87 सदस्यांच्या सभागृहात बहुमताचा 44 चा 'मॅजिक फिगर' एकाही पक्षाला गाठता आलेला नाही. अशा परिस्थितीत उद्या, गुरुवार 22 जानेवारी रोजी होणारी महापौरपदाच्या आरक्षणाची सोडत ही केवळ प्रशासकीय प्रक्रिया न राहता, अमरावतीच्या सत्तासमीकरणाचा कणा ठरणार आहे.

या निवडणुकीत भाजप 25 जागांसह सर्वात मोठा पक्ष ठरला असला, तरी बहुमतापासून तो तब्बल 19 जागा दूर आहे. राष्ट्रवादी काँग्रेसने 11, एआयएमआयएमने 12, काँग्रेसने 15, युवा स्वाभिमान पक्षाने 15, तर शिवसेनेच्या शिंदे गटाने 3 व ठाकरे गटाने 2 जागा मिळविल्या आहेत. 3 नगरसेवक बसपाचे तर एक नगरसेवक वंचित आघाडीचा निवडून आला आहे. म्हणजेच कोणताही पक्ष किंवा पूर्वनिश्चित आघाडी स्वबळावर सत्ता स्थापन करू शकत नाही. यामुळेच आता सत्ता कोणाची, हा प्रश्न 'पक्ष कोणता' यावर न राहता 'महापौरपद कोणत्या प्रवर्गासाठी आरक्षित होते' यावर येऊन ठेपला आहे.




### आघाडीशिवाय पर्याय नाही

भाजप सर्वात मोठा पक्ष असल्याने सत्ता स्थापनेचा दावा करत असला, तरी आरक्षण प्रतिकूल ठरल्यास त्यांना आघाडीशिवाय पर्याय उरणार नाही. दुसरीकडे राष्ट्रवादी आणि युवा स्वाभिमान मिळून 26 जागांची ताकद 'किंगमेकर'ची भूमिका बजावत आहे. एआयएमआयएमच्या 12 जागा कोणत्या बाजूला झुकतात, यावर सत्ता स्थापनेचा तोल ठरणार आहे. काँग्रेसच्या 15 जागाही कोणत्याही आघाडीला निर्णायक ठरू शकतात.

### तर बदलतील राजकीय गणिते

महापालिकेच्या 87 जागांपैकी तब्बल 44 जागा महिला आरक्षणातून आहेत. त्याशिवाय खुल्या प्रवर्गातूनही महिला उमेदवार निवडून आल्याने सभागृहात महिला नगरसेविकांची संख्या 48 आहे. ओबीसी प्रवर्गासाठी 23 जागा आरक्षित असून, या प्रवर्गातील प्रतिनिधीही संख्येने प्रभावी आहेत. अनुसूचित जातींसाठी 15 आणि अनुसूचित जमातीसाठी 2 जागा आरक्षित आहेत. त्यामुळे उद्याच्या सोडतीत महापौरपद महिला, ओबीसी किंवा अनुसूचित जाती प्रवर्गासाठी आरक्षित झाले, तर सध्याची सर्व राजकीय गणिते एका क्षणात बदलू शकतात.

### आरक्षण ठरविणार सत्ता

महापौरपद महिला प्रवर्गासाठी आरक्षित झाले, तर सभागृहातील जवळपास निम्म्या महिला नगरसेविकांचे संख्याबळ कोणत्या बाजूला जाते, यावर सत्ता ठरेल. ओबीसी प्रवर्गासाठी आरक्षण पडल्यास 23 पेक्षा अधिक ओबीसी नगरसेवक असलेल्या पक्षांची वाटाघाटीची ताकद प्रचंड वाढेल. अनुसूचित जाती प्रवर्गासाठी आरक्षण आल्यास 15 जागांच्या या गटावर सत्ता स्थापनेचा सारा खेळ अवलंबून राहील. म्हणजेच उद्याची सोडत ही फक्त आरक्षणाची नसून, थेट सत्ता कोणाच्या हाती जाणार याचा निर्णय देणारी ठरणार आहे.

### संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष

एकूणच अमरावती महापालिकेच्या सत्तेचा फैसला उद्या एका सोडतीवर अवलंबून आहे. बहुमत नसलेले सभागृह, अनेक पक्षांचे तुटलेले संख्याबळ आणि प्रवर्गनिहाय प्रभावी प्रतिनिधित्व यामुळे अमरावतीचे राजकारण 'आकड्यांच्या खेळा'पेक्षा 'आरक्षणाच्या चिठ्ठी'भोवती फिरू लागले आहे. उद्या गुरुवार, 22 जानेवारी रोजी निघणारी महापौरपदाची सोडत ही अमरावतीच्या राजकीय इतिहासात सत्ता बदलाचा टर्निंग पॉइंट ठरते की नाही, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# थ्रेसरवर काम करणाऱ्या युवकाची हत्या

### अष्टमा सिद्धी जंगलात खळबळ

**महासागर प्रतिनिधी**
**अचलपूर,(दि.21)** – अचलपूर तालुक्यातील अष्टमा सिद्धी जंगल परिसरात एका युवकाची निर्घृण हत्या झाल्याची धक्कादायक घटना समोर आली असून, त्यामुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. काजलडोह येथील रहिवासी बीरू शिवकली मरस्कोलहे (वय 40) यांची दारूच्या नशेत झालेल्या वादातून हत्या करण्यात आल्याचे प्राथमिक तपासात स्पष्ट झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शेतातील पीक काढण्यासाठी थ्रेसरवर काम करण्याच्या उद्देशाने काही जण जंगल परिसरात आले होते. कामाच्या दरम्यान दारू पिल्यानंतर त्यांच्यात किरकोळ कारणावरून वाद झाला. हा वाद इतका टोकाला गेला की आरोपींनी बीरू यांच्यावर प्राणघातक हल्ला



केला. या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच परतवाडा पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. बातमी लिहेपर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलीस पथक तैनात करण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे.

# रिद्धी ज्वेलर्स घोटाळा : शेकडो महिलांचा ठाण्यावर मोर्चा

### 20 कोटींहून अधिक रोख रक्कम व कोट्यवधींचे सोने हडप केल्याचा आरोप

**महासागर प्रतिनिधी**
**नांदगाव पेठ,(दि.21)** – रिद्धी ज्वेलर्स या सराफा व्यावसायिकाकडे गहाण ठेवलेले सोने, दागिने व जमा केलेली रोख रक्कम परत न मिळाल्याने संतप्त झालेल्या शेकडो महिलांनी व पीडित नागरिकांनी आज नांदगाव पेठ पोलीस ठाण्यावर धडक देत आरोपी सतीशचंद्र बहाड याच्याविरुद्ध तात्काळ गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. या घटनेमुळे काही काळ पोलीस ठाण्याला छावणीचे स्वरूप आले होते.

प्राप्त माहितीनुसार, अनेक नागरिकांनी रिद्धी ज्वेलर्सकडे सोने गहाण ठेवले होते, काहींनी दागिने बनवण्यासाठी सोने दिले होते, तर काहींनी मोठ्या प्रमाणात रोख रक्कम जमा केली होती. मात्र अचानक दुकान बंद करून आरोपी फरार झाला. तक्रारदारांनी सुमारे 20 कोटी रुपयांहून अधिक रोख रक्कम व कोट्यवधींचे सोने



हडप केल्याचा गंभीर आरोप केला आहे. या प्रकरणात महिला, शेतकरी, मजूर, व्यापारी अशा विविध स्तरांतील नागरिकांची फसवणूक झाल्याचे समोर आले आहे. अनेक महिलांनी संसारातील सर्व दागिने गहाण ठेवले होते, तर काहींनी मुलींच्या लग्नासाठी, घरबांधणीसाठी किंवा वैद्यकीय खर्चासाठी रक्कम जमा केली होती. त्यामुळे आज अनेक कुटुंबे आर्थिक संकटात सापडली आहेत. आज पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारींमध्ये गहाण ठेवलेले सोने–चांदीचे दागिने, लाखो रुपयांची रोख रक्कम, बनवण्यासाठी दिलेले दागिने व पूर्ण पैसे भरलेले व्यवहार यांचा समावेश आहे. बाधितांची संख्या वाढण्याची शक्यता असून, हा घोटाळा अमरावती जिल्ह्यातील मोठ्या सराफ फसवणूक प्रकरणांपैकी एक ठरू शकतो. संतप्त नागरिकांनी आरोपीला तात्काळ अटक करून मुद्देमाल परत मिळवून देण्याची मागणी केली. यावेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे यांनी सबळ पुरावे संकलित करण्यात आले असून तपासाअंती आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

# ते दार ठोठावित राहिले, डॉक्टर आलेच नाही, वाहनातच झाली प्रसूती!

### हतरू प्राथमिक आरोग्य केंद्रातील प्रकार

**महासागर प्रतिनिधी**
**चुरणी,(दि.21)** – चिखलदरा तालुक्यातील हतरू प्राथमिक आरोग्य केंद्रामधील संतापजनक प्रकार समोर आला. प्रसूतीसाठी रात्री आरोग्य केंद्रात आणलेल्या महिलेच्या कुटूंबियांनी आरोग्य केंद्राचे वारंवार दार ठोठावले, मात्र डॉक्टर किंवा जबाबदार व्यक्ती आरोग्य केंद्राच्या बाहेर आलेच नाही. अखेर गर्भवती महिलेची वाहनातच प्रसूती झाली. एवढेच नाही तर प्रसूतीनंतरही महिलेचे कुटूंबिय आरोग्य केंद्राचे दार ठोठावित राहीले, मात्र कुणीच बाहेर आले नाही, अखेर महिलेला तसेच परत गावी न्यावे लागले. ही भयानक घटना 19 जानेवारी रोजी घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, खुटिदा गावातील प्रेमंती सतीश




बेठेकर हिला प्रसूतीकळा सुरू होताच कुटुंबीयांनी तातडीने खासगी वाहनाची व्यवस्था करून रात्रीच हतरू प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्याचा प्रयत्न केला. दवाखान्याच्या गेटवर पोहोचताच वेळेवर उपचार मिळण्याऐवजी गाडीतच प्रसूती झाली. बाळाचा जन्म झाल्यानंतर उपस्थित डॉक्टर घटनास्थळी आले नाहीत, तसेच आई व बाळाची आवश्यक तपासणी, प्राथमिक उपचार किंवा औषधोपचार न करता ते परत गेल्याचा आरोप करण्यात आला आहे.

आई व नवजात शिशूची प्रकृती तपासली न गेल्याने कुटुंबीयांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. कोणतीही वैद्यकीय मदत न मिळाल्याने प्रेमंती बेठेकर या नवजात बाळासह आपल्या खुटिदा गावात परतल्या. ही बाब अत्यंत गंभीर असून माता व बालकांच्या आरोग्य सुरक्षेबाबत आरोग्य यंत्रणेच्या निष्काळजीपणाचे हे ठळक उदाहरण असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. या घटनेमुळे माताङ्कबाल आरोग्य सेवेतील त्रुटी पुन्हा एकदा उघडकीस आल्या आहेत. ग्रामीण व आदिवासी भागात आरोग्य सुविधा सक्षम असल्याचे दावे केले जात असले, तरी प्रत्यक्षात आपत्कालीन परिस्थितीतही सेवा अपुरी ठरत असल्याचे या घटनेतून स्पष्ट होते. वेळेवर उपचार, सुरक्षित प्रसूती व योग्य तपासणी ही प्राथमिक आरोग्य केंद्रांची जबाबदारी असताना अशा प्रकारचा हलगर्जीपणा कसा सहन केला जातो, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

### माजी आमदारांनी केली निलंबनाची मागणी

या प्रकरणाची तक्रार पीडित महिलेने माजी आमदार राजकुमार पटेल यांच्याकडे केली. त्यानंतर त्यांनी अमरावती जिल्हाधिकारी यांच्याकडे लेखी निवेदन सादर करून संबंधित डॉक्टर व कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्याची मागणी केली आहे. आदिवासी महिलांच्या व गरोदर मातांच्या आरोग्याशी असा खेळ सहन केला जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### चौकशीसाठी स्वतंत्र पथक पाठविणार!

दरम्यान, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रवीण पारिसे यांनी या घटनेची गंभीर दखल घेत चौकशीसाठी स्वतंत्र पथक पाठविण्यात येईल, संपूर्ण चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, अशी माहिती दिली आहे.

**महाराष्ट्र शासन कार्यालय कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, अचलपूर**

ई–मेल पत्ता :– achalpur.co@mahapwd.gov.in     दुरध्वनी/फैक्स क्रमांक :– 07223 220260

**निविदा सुचना क्रमांक–49/निली/2025–2026**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अचलपूर दूरध्वनी क्रमांक, 07223–220260 हे राज्यपाल, महाराष्ट्र शासन हयांच्या वतीने खालील कामांचे ब–1 नमुन्यातील ऑफलाईन निविदा सार्वजनिक बांधकाम विभाग महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून मागवित आहे. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahapwd.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावी. नोंदणीकृत कंत्राटदारांची इसारा रक्कम एफ.डि.आर स्वरूपात ऑफलाईन स्विकारण्यात येईल, तसेच निविदा स्विकारण्याचा तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अचलपूर यांनी राखुन ठेवला आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत |
|---|---|---|
| 1 | मौजे दाबीदा ता. धारणी जि. अमरावती येथे तलाठी कार्यालय व निवासस्थान दुरूस्ती करणे. | 401963.00 |
| 2 | मौजे चाकर्दा ता.धारणी जि. अमरावती येथे तलाठी कार्यालय व निवासस्थान दुरूस्ती करणे. | 401805.00 |
| 3 | मौजे बोबदो ता. धारणी जि. अमरावती येथे तलाठी कार्यालय व निवासस्थान दुरूस्ती करणे. | 401795.00 |
| 4 | मौजे विजुबावडी ता. धारणी जि. अमरावती येथे तलाठी कार्यालय व निवासस्थान दुरूस्ती करणे. | 402095.00 |
| 8 | मौजे कांडली ता. अचलपूर जि. अमरावती येथे विठ्ठल शिंदे ते बी. काळे यांचे घरापर्यंत सिमेंट काँक्रिट रस्ता बांधकाम करणे. | 422668.00 |
| 9 | मौजे राणीगांव ता.धारणी जि. अमरावती येथे परसराम कासदेकर ते मनीराम यांडे यांचे घरापर्यंत सिमेंट काँक्रिट रस्ता बांधकाम करणे. | 808439.00 |
| 10 | मौजे खापरखेडा ता.धारणी जि. अमरावती येथे हिरालाल जावरकर ते रामप्रसाद जावरकर यांचे घरापर्यंत सिमेंट काँक्रिट रस्ता व नाली बांधकाम करणे. | 809331.00 |
| 11 | मौजे सुसर्दा ता.धारणी जि. अमरावती येथे बस स्टॉपवर पिक–अप शेड बांधकाम करणे. | 420290.00 |
| 12 | मौजे पनोट ता.अचलपूर जि. अमरावती येथे वार्ड क्र.6 मध्ये गजानन महाराज मंदिराचे दिशेने यांचे घरापर्यंत सिमेंट काँक्रिट रस्ता बांधकाम करणे. | 842600.00 |
| 1 | ऑफलाईन निविदा डाऊनलोड करण्याचा कालावधी | दि. 23/09/2026 @ 10.00 वाजता ते 30/01/2026 @ 17.00 वाजता |
| 2 | निविदा पुर्व बैठक स्थळ, दिनांक व वेळ | निरंक |
| 3 | निविदाकारांनी ऑफलाईन निविदा तयार करण्यासाठी (तांत्रिक व आर्थिक निविदा) निविदेची हार्ड कॉपी सादर करण्याचा ठिकाण, दिनांक व वेळ | ऑफलाईन निविदा बाबतची हार्ड कॉपी (तांत्रिक लिफाफा) सीलबंद लिफाफ्यामध्ये दि. 04/02/2026 @ 17.00 वाजतापर्यंत निवीदे नुसार कार्यालयात सादर करणे बंधनकारक आहे. |
| 4 | ऑफलाईन तांत्रिक व आर्थिक निविदा उघडण्याचे ठिकाण, दिनांक व वेळ | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अचलपूर यांचे कार्यालयात दि. 05/02/2026 @ 15.00 ते @ 17.00 वाजेपर्यंत ऑफलाईन उघडण्यात येतील. (शक्य झाल्यास) |

**खालील संकेतस्थळावर ऑफलाईन निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.**

1) http://mahapwd.gov.in
(सदर निविदे सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील बेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
2) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अधलपुर कार्यालयातील सूचना फलक

जावक क्रमांक:– 342/निली/2025–2026/दि.21/01/2026
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सार्वजनिक बांधकाम विभाग, अचलपूर

**(प्रमोद बा, वानखडे)**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनीक बांधकाम विभाग अचलपूर**

# ठाकरे बंधूंना आत्मपरीक्षण करावंच लागेल!

आम्ही म्हणजेच महाराष्ट्र, आम्ही म्हणजेच मराठी, त्यामुळे आम्ही सांगू त्याप्रमाणे मराठी जनतेने एकत्र यावे, अशी भावना राज ठाकरे व उद्धव ठाकरे या दोघा भावांची असू शकेल. परंतु, कार्यकर्त्यांना बळ देण्यासाठी ज्या काही 'ट्रिक' वापरायच्या असतात, त्याबाबतीत मात्र दोघे बंधू कमालीचे कमी पडले आहे. अन्यथा आज मुंबई या दोघा भावांच्या हातात असती. महापालिका निवडणुकीच्या निमित्ताने त्यांच्यासह ज्या काही नेत्यांनी सभा गाजवल्या, त्यात या दोघा भावांचा नक्कीच समावेश आहे. परंतु पार पडलेल्या सभांचे वर्णन ऐकल्यानंतर आपण नेमके कोणत्या टोकावर उभे आहोत याचे आत्मपरीक्षण ठाकरे बंधूंनी करणे गरजेचे आहे. कारण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निवडणुकीच्या काळात ३७ सभा घेतल्या, तर त्यांच्या पाठोपाठ भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी ३५ सभा घेतल्या. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी २९ सभा घेतल्या, तर दुसरे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी अनुक्रमे २५ सभा घेतल्या. थोड्याफार प्रमाणात कमी जास्त असल्या तरी या सर्वांनी जवळपास सारख्या सभा घेतल्या. तुलनेने उद्धव व राज ठाकरे यांनी अवघ्या तीन सभा घेतल्या. याचाच अर्थ असा की संघर्ष करताना दोघे बंधू किती कमी पडले हे समजून घेतले पाहिजे. कार्यकर्त्यांशी थेट संपर्क नाही, त्यांच्याशी जवळीक नाही, दोघांनी एकत्र यायला लावलेला वेळ व कार्यकर्त्यांपासून दूर अंतरावर राहण्याची सवय, यामुळे जनतेची इच्छा असूनही मुंबईत बहुमत मिळू शकले नाही. नाशिक सारख्या शहरात एवढी विराट सभा होऊनही काय वाट लागली हे समजून घेतले पाहिजे. उद्धव ठाकरेंच्या विरोधात एकनाथ शिंदे यांनी केलेले बंड खरोखरच भयानक व जिव्हारी लागणारेच होते. पण त्याचा बिमोड करण्यासाठी जी खेळी करायची असते, जे कष्ट करायचे असतात, त्या बाबतीत मात्र उद्धव ठाकरे कमी पडले. तर राज ठाकरेंनी ज्या काही खेळी करायच्या ठरविले असेल, त्या मात्र निवांत करायला घेतल्या. राजकारणात उतरल्यानंतर इतक्या निवांत खेळी करून चालत नाही, हे ठाकरे बंधूंना कोण सांगणार? कारण महाराष्ट्राचं राजकारण गेल्या दोन अडीच वर्षात पूर्ण बिघडून गेलं आहे. छळ कपट मोठ्या प्रमाणावर घडले आहे. पंचवीस वर्षांची सोबत करणारा पक्ष निर्दयपणे फोडण्याचं पातक करण्यात आलं. उद्धव ठाकरेंना त्यांच्याच पक्षाच्या आमदारांनी अक्षरशः लुबाडले म्हटले तरी वावगे ठरणार नाही. त्यातच विरोधी पक्षांच्या दृष्टिकोनातून ईडी, सीबीआय, फैसला न देणारे न्यायालय, अमाप काळा पैसा, सरकारी पैशांतून योजनांची खैरात, धाकधपटशा, लोढा, लाड, कंबोज सारखे फंड मॅनेजर्स, निवडणूक आयोग, पोलीस यंत्रणा, सगळ्या सरकारी यंत्रणा, समृद्धीतून कमावलेला अमाप पैसा, सत्तर हजार कोटींचा घोटाळा धकवून खाल्लेलं कमिशन, मुख्यमंत्री, मंत्रीमंडळ, खासदार, आमदार, केंद्राचा वरदहस्त, अदानी, चाकर, माध्यमं असं सर्व काही शिंदेंनी पळवलेलं, पुन्हा उभारलेलं नवं संघटन, गणित खूप अवघड झाले होते. अशा अवस्थेत ठाकरे बंधू ७२ वर पोहोचणं म्हणजे पराभव नाही, तो सत्ताधाऱ्यांना दिलेला इशारा आहे. मुंबईत भाजप-शिंदे गट ११६ जागांवर पोहोचला आहे. पहिल्या नजरेला हा आकडा मोठा वाटतो. पण थोडं थांबून, थंड डोक्याने आणि प्रामाणिकपणे पाहिलं, तर हा आकडा विजयाचा नाही, तर अस्वस्थतेचा आहे. कारण एक गोष्ट विसरता कामा नये, ठाकरे गटाची ही लढाई पूर्णपणे शून्यापासून सुरू झाली होती. चिन्ह चोरलं गेलं, पक्ष फोडला गेला, कार्यकर्ते फोडले गेले, राज्य आणि केंद्र सरकारची संपूर्ण यंत्रणा वापरली गेली, पैसा ओतला गेला, दबाव टाकला गेला, तरीही ठाकरे उभे राहिले आणि जनता त्यांच्या पाठीशी उभी राहिली.

शिवसेना एकसंध असती, तर सेनेनंच मुंबई जिंकली असती. फक्त मुंबईच नव्हे, तर ठाणे, नवी मुंबई, कल्याण आणि कदाचित संभाजीनगरही जिंकता आलं असतं. यावेळची निवडणूक ही सोपी नव्हती. अचाट धनशक्ती, सत्तेची शक्ती विरुद्ध ठाकरे अशी लढाई होती.

राज व उद्धव ठाकरे यांनी ज्या काही जागा मिळविल्या त्या जागांपैकी जवळपास ३५ नगरसेवक सेटिंगमधून आलेले आहेत आणि उरलेले ३५ पूर्णपणे नवीन, ताजे, न झुकलेले चेहरे आहेत. म्हणजे हा विजय कुठल्याही लोकलाटेविरोधात आलेला नाही, तर सत्ताधाऱ्यांनी उभ्या केलेल्या अडथळ्यांवर मात करून मिळवलेला आहे.,

दुसरीकडे पाहिलं तर अमाप पैसा, केंद्र व राज्य सरकारची ताकद, चोरलेले कार्यकर्ते, बाहेरून आणलेले नेते हे सगळं असूनही भाजप-शिंदे गट ११६ च्या पुढे जाऊ शकला नाही. हा विजय नाही. हा सत्तेच्या माजाला बसलेला धक्का आहे.

इतकं सगळं करूनही जर विजय निसटता असेल, तर तो विजय नसतो तो भविष्यासाठी दिलेला इशारा असतो. म्हणूनच सांगावंसं वाटतं हा पराभव ठाकरेंचा नाही. हा पराभव सत्तेच्या अहंकाराचा आहे. मुंबई अजूनही ठाकरेंचीच आहे. मुंबईतल्या मराठी माणसांचे लढाऊ स्पिरीट संपलेले नाही. ठाकरे बंधूंना मिळालेल्या जागा हा त्याचा पुरावा आहे. हिंदुत्व, लाडकी बहीण, विकास अशी निमित्ते सांगून महायुती लोकांना घोळवत होती.

हे अनैतिक राजकारण पसंत नव्हते असे लोक अस्वस्थ होते. पण त्यांची कोंडी झाली होती. याच वेळी ठाकरे बंधू एकत्र झाले. त्यांचा निर्धार आणि लोकांची अस्वस्थता यांची तार जुळली आणि ठाकरे बंधूंना लक्षणीय यश मिळालं. या अस्वस्थ मतदारांसाठी त्यांची सेना हे एक साधन होते. त्यामुळे या मतदानाद्वारे लोकांनी दोघा बंधूंवर एक मोठी जबाबदारी टाकली. इथून पुढे ती ते कशी पार पाडतात हे पाहावे लागेल.

खरं म्हणजे त्यांनी आधीच एकत्र यायला हवे होते, आणखी प्रचार करायला हवा होता, असे मत अनेकांनी व्यक्त केले व ते खरे पण आहे. कारण, भाजपने फोडाफोडी करून आणि पैशांचा वापर करून सेनेला इतके घायाळ केले होते की, ठाकरेंना हालचालीला जागा कमी होती. त्यातून त्यांनी धावाधाव केली असतीच तर भाजपने आणखी दुप्पट प्रचार व पैसे खर्च केले असते. आणखी फोडाफोडी केली असती.

या स्थितीत लोकांना भावनिक आवाहन करणे हाच एक मार्ग त्यांकडे होता. निकाल ऐकल्यावर मुंबईत उद्धव ठाकरेंना संपवायला गेलेले एकनाथ शिंदे फसले.

दुसरीकडे याच भाजपने पुण्यात अजित पवार, शरद पवारांना न भूतो न भविष्यती दणका दिला. दुसरीकडे मुंबई, पुण्यासह अनेक ठिकाणी मरगळलेल्या काँग्रेसला संधी मिळाली. काही ठिकाणी महापौरही होतील. तरी देखील असे म्हणता येईल की, उद्धव आणि राज ठाकरे यांनी ना मुंबईच्या विकासाच्या भावी योजनांचा उल्लेख केला, ना विद्यमान भाजप सरकारच्या महापालिकेच्या कारभारातील कथित भ्रष्टाचार व अकार्यक्षमतेचा उल्लेख केला.

त्यांच्या भाषणाचा सारा भर मुंबई महाराष्ट्रापासून कशी तोडली जाणार आहे, या भ्रामक आणि पूर्णपणे काल्पनिक संकल्पनेवर होता.




ती कल्पना मुंबईकरांच्या गळी उतरवून त्यांच्या मनात भाजपविषयी भीती आणि तिरस्कार उत्पन्न करण्याचा त्यांचा प्रयत्न सपशेल फसला. प्रत्येक निवडणुकीत 'कोथळा काढू' अशी तीच तीच वाक्य ऐकून मुंबईकर कंटाळले होते.




९४२०६११४२०

विकासाच्या मुद्द्यावर ठाकरे बंधू काहीच बोलायला तयार नव्हते. मुंबईतील अनेक प्रकल्पांना स्थगिती देऊन उद्धव ठाकरे यांनी त्याचा अनुभव यापूर्वीच दिला आहे. ठाकरे बंधूंनी हातात ना सत्ता, ना जुने लोक, सगळं नव्याने सुरू करून, फक्त आठवडाभर प्रचार केला, एकच सभा झाली, तरीही ७२ जागा मिळाल्या! आणि भाजपकडून काय? मुख्यमंत्री, आमदार, खासदार, केंद्राची यंत्रणा, पोलीस, मीडिया, पैसा सगळं वापरून दहावर्षांत वाढ फक्त सात जागांची!

मुख्यमंत्री म्हणाले होते २९ पैकी २७ महा नगरपालिका येणार. वास्तविक चित्र असे की, चंद्रपूर, लातूर, परभणी, वसईझविरार, कोल्हापूर इथे विरोधकांची सत्ता आली. २४ पैकी फक्त नऊ ठिकाणीच भाजप एकटी निवडून आली.

सत्ता, यंत्रणा, पैसा सगळं हातात असूनही विरोधकांना रोखलं आलं नाही. मग खरंच प्रश्न पडतो की देवाभाऊ खरंच जिंकले की हरले? कमळ फुलले. कमळ फुलवले! सेना मनसे हरले. सेना मनसे जिंकलेही!!

निवडणूक झाली, निकाल लागले, ज्यांना जसे हवे होते तसे त्यांनी लावून घेतले. त्यामुळेच हरले कोण आणि जिंकले कोण हे कागदावरचे गणित कमळ फुललेले दाखवत असले तरी गल्ली बोळातून खणखणीत आवाज आताही येतोय तो फक्त सेना मनसेच्या युतीचाच. खोटं वाटतं असेल तर मुंबईच्या कुठल्याही नाक्यावर उभे रहा. शांतपणे चर्चा ऐका. मग कळेल आम मराठी जनतेची मने त्यांनीच जिंकलीत.

अर्थात हार ही हारच असते. त्याला कितीही मुलामा लावला तरी पराभव खेदजनकच असतो. पण हा पराभव असला तरी खेदजनक वाटत नाहीये. कारण सगळं काही विरोधात असताना मराठी माणसानं रस्त्यावर उतरून आवाज शिवसेना मनसेचाच राहील हे शिवतीर्थावरच दाखवलं.

सेना मनसेला ७२ जागा मुंबईत मिळाल्या. जवळपास ४० आमदार पळवणारे अवघ्या २५ नगरसेवकांमध्येच आटोपले. भाजप अशांना कधीच मोठं करत नाही. मुंबईत भाजप हंड्रेड प्लस झाली. त्यात दुसऱ्यांची पळवलेली पोरंच जास्त निवडले.

### मुंबईतील अमराठी मतांच ध्रुवीकरण कस केलं?

मुंबईतील महापालिका निवडणुकांचे विश्लेषण करतांना लक्षात येते की, निशिकांत दुबे येऊन गेला, भैय्या बिहारी विरुद्ध मराठी वाद लावून गेला. निलेश चंद्र मुनी उठला, गुजराती जैन विरुद्ध मराठी वाद लावून गप्प बसला. नंतर अण्णामलाई आला, दक्षिणात्य विरुद्ध मराठी वाद लावून गेला. या तिघांच्या मागे कोण होतं तर फक्त भाजप. निशिकांत दुबेने मराठी भाषिकांचा अपमान केला. सर्व मराठी जनांना तो स्वतःचा अपमानच वाटला नाही. वाद लावला गेला निशिकांत दुबे आणि राज ठाकरे यांच्यात. मग यासाठी उत्तर भारतातले ट्विटर खाती, हिंदी मीडिया वापरले गेले. कबुतरांचा विषय सर्व प्रथम विधानसभेत मांडला आमदार मनिषा कायंदे आणि आमदार चित्रा वाघ यांनी. जैन गुजराती बिथरले. या वादाला पद्धतशीरपणे जैन गुजराती विरुद्ध मराठी रंग दिला गेला. हा रंग देण्यासाठीही मीडिया आणि भाजपचे आयटी सेलवाले कामाला लावले गेले. अर्थातच नंतर गुजराती जैन विरुद्ध ठाकरे हे ठरवलेलंच होतं. हा निलेश चंद्र मुनी सर्व जैन लोकांना निवडणुकीला उभे करणार होता. मग काय झालं त्याचं ? हे सर्व स्टंट होते आणि या सवामागे होता तो अर्थातच भाजप. नंतर आणला तो अण्णामलाई. त्याने मुंबई आणि मुंबईतील मराठी माणसाला सरळसरळ डिवचलं. वरच्याच पद्धतीने रंग दिला तो दक्षिणात्य विरुद्ध ठाकरे असा. मराठी माणसाच्या, मुंबईच्या, महाराष्ट्राच्या स्वाभिमानाला कोणी ठेच लावली की ठाकरे बंधू मध्ये पडल्याशिवाय रहाणार नाहीत, हे भाजपला बरोबर माहितेय. ठाकरेंच्या याच मराठी बाण्याचा दुरुपयोग भाजपने केला आणि मुंबईतील सर्व अमराठी मतांच ध्रुवीकरण केलं.

# विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याचे शिल्पकार : गजानन मोरे






mahasagarngp@gmail.com

मोठ्या परिश्रमातून बारावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण करून उत्तम गुण मिळवूनही, केवळ प्रवेश परीक्षांचे जटिल नियम व किचकट पद्धतीविषयी अज्ञान असल्याने अनेक विद्यार्थी आपले उत्तम भविष्य घडविण्यापासून वंचित राहू शकतात. ही बाब जेव्हा गजानन मोरे यांनी हेरली, तेव्हा समुपदेशनाद्वारे (काउंसलिंग) विद्यार्थी व पालकांच्या अडचणी सोडविण्यासाठी त्यांनी सनबीम एज्युकेशन प्रवेश प्रक्रिया केंद्राची स्थापना केली.

या केंद्रामार्फत फॉर्म भरण्यापासून ते प्रवेश प्रक्रियेपर्यंत विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडविण्याचे कार्य ते करतातच; शिवाय त्यांच्या उज्ज्वल भविष्याचे खरे शिल्पकार ठरले आहेत.

सनबीम एज्युकेशन प्रवेश प्रक्रिया केंद्राचे संस्थापक गजानन मोरे यांनी परभणी जिल्ह्याच्या सेलू तालुक्यातील कुपटा या गावी प्राथमिक शिक्षण घेतले, तर जालना जिल्ह्यातील मंठा येथून महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. पदवी शिक्षणासाठी ते नांदेड येथे आले,येथेच कम्प्युटर अप्लिकेशनमध्ये बीसीए पूर्ण केले. सोबतच ओपन युनिव्हर्सिटीमधून बी.ए.चे शिक्षण घेतले.

शेतकरी कुटुंबात जन्माला आल्यामुळे परिस्थिती बेताचीच होती. त्यामुळे कमवा आणि शिका या तत्त्वावर शिक्षण घेत असतानाच त्यांनी नांदेड येथील प्रचलित बारावी विज्ञान शाखेच्या खाजगी ट्युशन वर्गामध्ये नोकरी पत्करली. या ठिकाणी ते विद्यार्थ्यांचे फॉर्म भरणे, नोट्स काढणे, प्रश्नपत्रिका तयार करणे, निकाल लावणे यांसारखी संगणकीय कामे करीत होते. या कामातून विद्यार्थी व पालकांशी निगडित समस्यांशी त्यांचा जवळून संबंध आला.

२००७-०८ पासून बारावी व बारावीनंतरच्या प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन होऊ लागल्या. याबाबत जागृती नसल्याने अडचणीत असलेले विद्यार्थी व पालक मार्गदर्शनासाठी मोरे यांच्याकडे मोठ्या आशेने येऊ लागले. गजानन मोरे आपल्या ज्ञानाचा व माहितीचा त्यांना फायदा करून देऊ लागले. यातून त्यांना जाणवले की विद्यार्थी आणि त्याच्या करिअरमधील मुख्य दुवा म्हणजे समुपदेशन (काउंसलिंग) होय.

विद्यार्थ्यांचे शिक्षण व करिअर घडविण्यासाठी सामाजिक बांधिलकी जपली पाहिजे, असा संकल्प त्यांनी केला आणि २००८ साली सनबीम एज्युकेशनची स्थापना केली. जीव ओतून काम करण्याची तयारी आणि विद्यार्थी व पालकांशी जुळलेले स्नेहबंध यामुळे सुरुवातीलाच त्यांना भरघोस प्रतिसाद मिळाला. या यशानंतर त्यांनी खाजगी ट्युशन क्लासेसचे काम पूर्णपणे बंद करून सनबीम एज्युकेशन या संस्थेवर लक्ष केंद्रित केले.

ते सांगतात की त्यांनी जेव्हा काम सुरू केले, तेव्हा एमबीबीएस व इंजिनिअरिंगसाठी संपूर्ण भारतात विविध विद्यापीठांमार्फत सुमारे ५२ वेगवेगळ्या प्रवेश परीक्षा घेतल्या जात होत्या. विद्यार्थ्यांना मिळालेले गुण व त्यांचा कल लक्षात घेऊन एमबीबीएस, बी.ए.एम.एस., फार्मसी, बीडीएस, एमबीए, अभियांत्रिकी अशा विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी फॉर्म भरण्यापासून ते अंतिम प्रवेश प्रक्रियेपर्यंत ते विद्यार्थ्यांना सर्वतोपरी मदत करीत असत.

२०१७ नंतर सीईटी, जेईई, नीट या परीक्षा सुरू झाल्या. मात्र या परीक्षांचे नियम दरवर्षी बदलत असतात. या बदललेल्या नियमांची माहिती ते सातत्याने घेत असतात. यावर्षी किती विद्यार्थी उत्तीर्ण झाले, कटऑफ किती आहे, विद्यार्थ्याला प्राप्त झालेले गुण यामधील तंतोतंत गणित जुळवून कोणत्या विद्यापीठात,कोणत्या महाविद्यालयात फॉर्म भरावा याची अचूक माहिती ते देतात.

विद्यार्थी आर्थिकदृष्ट्या कमकुवत असल्यास, इतर कोणत्या राज्यात त्याला संधी उपलब्ध आहे याची योग्य माहितीही ते पुरवितात. विद्यार्थ्यांची मेहनत वाया जाऊ नये म्हणून कमी गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांनाही अंतिम क्षणापर्यंत प्रवेश मिळवून दिल्याचा त्यांना अभिमान आहे.

ते अभिमानाने सांगतात की आतापर्यंत २० ते २५ हजार विद्यार्थ्यांनी वैद्यकीय शिक्षणात, तर ३० ते ३५ हजार विद्यार्थ्यांनी अभियांत्रिकी अभ्यासक्रमात प्रवेश घेतला आहे.

त्यांच्या मार्गदर्शनातून अनेक विद्यार्थी परदेशातही शिक्षणासाठी गेले आहेत. या अथक मेहनतीचे फळ म्हणून सनबीम एज्युकेशन प्रवेश प्रक्रिया केंद्र आज चार शाखांमध्ये विस्तारले आहे.

नांदेड जिल्ह्यात दरवर्षी शिक्षणासाठी लाखांच्या घरात विद्यार्थी येतात. त्यांचे शिक्षण सोयीस्कर व्हावे व राहण्या-खाण्याची योग्य व्यवस्था व्हावी, या संवेदनशील विचारांतून त्यांनी ज्ञानश्री गर्ल्स अँड बॉईज हॉस्टेलची स्थापना केली. सध्या ते एकूण पाच हॉस्टेल्स चालवित आहेत. या कार्यातूनच २०२० साली नांदेड जिल्हा हॉस्टेल असोसिएशनच्या जिल्हाध्यक्षपदी त्यांची बिनविरोध निवड झाली.

याच काळात विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी सर्व हॉस्टेल चालकांना एकत्र करून प्रशासनाच्या सहकार्याने पोलिसांची गस्त वाढविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी करून घेतले. तसेच इंटरनेट ट्रेनिंग व सायबर क्राईमसारख्या विषयांवरील सेमिनारद्वारे जनजागृती केली.

ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांची परिस्थिती लक्षात घेऊन २०११ साली मॉसाहेब जिजाऊ संस्थेमध्ये प्री-प्रायमरी स्कूलची, तर २०२४ साली ज्ञानेश्वरी स्कूल ऑफ नर्सिंगची स्थापना त्यांनी केली. त्यांच्या ध्येयप्रेरित कार्यामुळे ही संस्था आता पहिली ते बारावीपर्यंतच्या शाळा व महाविद्यालयामध्ये रूपांतरित झाली आहे.

गजानन मोरे यांच्या पत्नी गौरी मोरे या देखील या सेवाभावी कार्यात सक्रिय आहेत. गरीब, अनाथ, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या तसेच आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या मुलींसाठी त्यांनी अकोला, औरंगाबाद, पुणे, नांदेड व नागपूर येथे वस्तीगृहे सुरू केली आहेत. यामुळे अनेक मुली शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आलेल्या आहेत.

गजानन मोरे यांच्या कार्याची दखल घेत २०१८ साली त्यांना सकाळ माध्यम समूहाचा महाराष्ट्रातील नामांकित युथ आयकॉन पुरस्कार प्रदान करण्यात आला. २०२२ साली महात्मा फुले शिक्षक परिषदेचा शिक्षणरत्न पुरस्कार तसेच राष्ट्रीय युवा उद्योजक नागरिक पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. २०२४ साली पद्मनाभ फाउंडेशन, पुणे यांच्याकडून शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल पुरस्कार प्राप्त झाला आहे.

ते विद्यार्थी व पालकांना नेहमी सांगतात की विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याचा मार्ग योग्य समुपदेशनातूनच जातो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी उत्तम फीडबॅक असणाऱ्या काउंसलरचा सल्ला घ्यावा. विद्यार्थ्यांचे करिअर घडविण्यात मार्गदर्शक दुवा ठरलेले गजानन मोरे यांचे कार्य चिरंतर सुरू राहो, यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा.

---------------

**गजानन मोरे संपर्क क्रमांक**
**9028999019**

# राष्ट्रवादी (शप) ची निराशाजनक कामगिरी!



२०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत उत्तम कामगिरी केलेल्या शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसची त्यानंतर झालेली घसरगुंडी अतिशय चिंताजनक आहे.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसने लढविलेल्या १० जागांपैकी ८ जागा जिंकून नेत्रदीपक कामगिरी केली होती.त्यांचा स्ट्राईक रेट इतर पक्षांच्या तुलनेत अतिशय चांगला होता. मात्र त्यानंतर झालेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी (शप) ची कामगिरी अतिशय निराशाजनक झाली.



अभय गोखले

पक्षाने मोठ्या प्रमाणात जागा लढवूनही केवळ १० जागा पक्षाला जिंकता आल्या.त्यानंतर झालेल्या नगरपालिका निवडणुकीतही राष्ट्रवादी (शप) ची कामगिरी अतिशय सुमार झाली.

या पार्श्वभूमीवर जेव्हा २९ महापालिकांच्या निवडणुका घोषित झाल्या तेंव्हा राष्ट्रवादी (शप) ची कामगिरी कशी होईल याकडे सर्वांचे लक्ष होते.महापालिका निवडणुकीत शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीने काही ठिकाणी अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस बरोबर आघाडी केली होती.

त्यामध्ये प्रामुख्याने पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा समावेश होता. या महापालिकांमध्ये भाजपा आणि राष्ट्रवादी यांच्यात युती होणार नाही, हे? निश्चित झाल्यानंतर, राष्ट्रवादीने, शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीशी आघाडी करण्याचा निर्णय घेतला होता.

त्या निमित्ताने एकमेकांचे राजकीय विरोधक असलेले हे पक्ष, भाजपाला हरवण्यासाठी एकत्र आले होते.विशेषतः पुणे आणि पिंपरी चिंचवड हे अखंड राष्ट्रवादीचे पुवार्पार बालेकिल्ले मानले जात असल्याने,या दोन्ही पक्षांनी आपली ताकद पणाला लावली होती. अजित पवार यांच्या दृष्टीने तर पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची निवडणूक अतिशय प्रतिष्ठेची होती.

२०१७ मध्ये झालेल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणुकीत, भाजपाने विजय मिळवला आणि राष्ट्रवादीची तेथील सत्ता संपुष्टात आणली. १२८ सदस्यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत गेल्या खेपेला भाजपाने ७७ जागा जिंकल्या होत्या. याखेपेस ८४ जागा जिंकून, भाजपाने आपल्या कामगिरीत सुधारणा केली आहे. अजित पवार यांनी पायाला भिंगरी लावून प्रचार केल्यानंतरही, त्यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीला फक्त ३७ जागांवर विजय मिळाला आहे.

अशा प्रकारे पिंपरी चिंचवड महानगरपालिका जिंकण्याचा अजित पवार यांचा प्रयत्न अयशस्वी ठरला आहे. राष्ट्रवादी (शप) ला तर पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणुकीत एकही जागा जिंकता आलेली नाही. पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणुकीत अजित पवार आणि शरद पवार आघाडीचा पराभव का झाला, त्याला काही कारणे आहेत.

महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये असलेले वरील दोन पक्ष पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणुकीत एकत्र आल्याने त्यांच्या मतदारांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते. त्यातच उमेदवार निवडीमध्येही दोन्ही पक्षांनी चुका केल्याने त्याचा फटका त्यांना निवडणुकीत बसला.

---------------

(उर्वरीत भाग उद्याच्याअंकात)

## माघी गणेश जयंती

येत्या २२ तारखेला श्री गणेश जयंती अर्थात 'माघी गणेश जयंती' आहे. आज आपण या दिवसाचे महत्त्व जाणून घेऊया. या दिवशी सर्वात प्रथम श्री गणेश तत्वाच्या लहरी पृथ्वीवर आल्या. या दिवसाचे वैशिष्ट्य म्हणजे या दिवशी श्री गणेशाचे तत्व अन्य दिवसांच्या तुलनेत एक हजार पटीने पृथ्वीवर येत असते. त्यामुळे आपण जर गणपतीची कोणत्याही प्रकारे उपासना केली तर आपल्याला गणपतीच्या कृपेचा एक हजार पटीने लाभ होतो. त्यामुळे या दिवशी आपण प्रातःसमयी पासून रात्रीपर्यंत जेव्हा शक्य होईल तेव्हा श्री गणेशाचा नामजप करणे, गणपतीची भावपूर्ण पूजा, आरती करणे, गणपतीला लाल फूल व दुर्वा वहाणे याप्रकारे उपासना करू शकतो आणि गणेश तत्व ग्रहण करण्याचा प्रयत्न करू शकतो.

वाचक लिहितात

गणपतीचा 'ॐ गं गणपतये नमः किंवा 'श्री गणेशाय नमः हा नामजप करू शकतो. गणपती अथर्वशीर्ष म्हणणे सुद्धा पुष्कळ लाभदायक आहे. अथर्वशिषार्ची फलश्रुती वाचल्यानंतर या स्तोत्राचे प्रचंड सामर्थ्य लक्षात येईल. बुद्धिदाता, विघ्नहर्ता श्री गणेशाला शरण जाऊन प्रार्थना करूया की, त्याने आम्हाला कायम सुबुद्धी देवो, आमची विवेकबुद्धी कायम जागृत राहो आणि आमच्याकडून त्याला अपेक्षित असे कार्य घडो!

**सौ. आदिती अमित देखणे, नवीन पनवेल.**

### रथसप्तमी विशेष

माघ महिन्यातील शुक्ल सप्तमीला रथसप्तमीचा उत्सव साजरा केला जातो. या दिवसापासून सूर्यदेवता त्यांच्या रथामध्ये बसून सर्वत्र संचार करतात. सूर्यदेवतेच्या रथाला सात घोडे जुंपलेले असतात. त्यामुळे या सणाला रथसप्तमी असे म्हणतात. या दिवशी रांगोळीने पाटावरती किंवा अंगणात सात घोडे जुंपलेल्या सूर्यनारायणाचा रथ काढतात. त्या रथामध्ये सूर्यदेवता विराजमान झाली असा भाव ठेवतात. अंगणामध्ये गवऱ्या पेटवून त्यावर संक्रांतीला पूजन केलेली एक सुगड त्यात दूध घालून ठेवतात. पेटलेल्या गवऱ्यांमुळे ते दूध तापून उतू जाऊन अग्नीला अर्पण होते. अग्नीला देवांचे मुख समजतात. अग्नीला जे अर्पण करतो ते सर्व देवांना आपोआपच मिळते. सुगडामधील उतू जाऊन उरलेले दूध सर्वांना प्रसाद म्हणून वाटतात.

**■ मनिषा बोराटे, सातारा.**

## घरच्या घरी वेलची लावण्याचे आरोग्यदायी फायदे



हिरव्या वेलचीला मसाल्यांची राणी म्हटले जाते आणि त्याचा सुगंध प्रत्येक गोड, चहा आणि पदार्थाची चव वाढवतो. परंतु बाजारातील वेलची खूप महाग असते आणि कधीकधी भेसळही आढळते. अशावेळी असा प्रश्न उपस्थित होतो की आपण आपल्या बागेत वेलची उगवू शकत नाही का? याचे उत्तर आहे हो, तुम्ही आपल्या कुंडीत वेलचीचे रोप सहज वाढवू शकता. ते घरी पिकवलं तर वर्षभर शुद्ध आणि ताजे मसाल्यांचाही आस्वाद घेता येईल. परंतु यासाठी योग्य माती, ओलावा आणि योग्य काळजी घेणे आवश्यक आहे.

बाल्कनी, टेरेस, अंगण किंवा खिडकीजवळील मोकळी जागा यासाठी योग्य ठरते. त्या जागी पुरेसा सूर्यप्रकाश आणि हवा मिळते याची खात्री करावी. नंतर कुंड्या, प्लास्टिकचे डबे, मातीची भांडी किंवा रिसायकल केलेल्या बाटल्यांचा वापर करता येतो. झाडांसाठी चांगली माती, कंपोस्ट किंवा शेणखत मिसळून तयार करावी, जेणेकरून झाडांना योग्य पोषण मिळेल. गार्डनसाठी सुरुवातीला तुळस, पुदीना, कोथिंबीर, मिरची, टोमॅटो, मनी प्लांट किंवा गुलाब यांसारखी कमी निगा लागणारी झाडे निवडावीत. झाडांना नियमित पण गरजेइतकेच पाणी द्यावे; जास्त पाणी दिल्यास मुळे कुजतात.

सकाळी किंवा संध्याकाळी पाणी देणे उत्तम असते. आठवड्यातून एकदा सेंद्रिय खत घालावे आणि वाळलेली पाने काढून टाकावीत. झाडांवर किडी आढळल्यास नैसर्गिक उपाय जसे की कडुनिंबाचा अर्क वापरावा. नियमित काळजी, प्रेम आणि संयम ठेवला तर घरातील गार्डन हिरवेगार, सुंदर आणि ताजेतवाने राहते, तसेच घरात सकारात्मक वातावरण निर्माण होते.

वेलची उगवण्यासाठी योग्य वेळ उष्ण आणि दमट हवामानात वेलची चांगली वाढ होते. त्यामुळे जर तुम्ही ते तुमच्या बाल्कनीत लावण्याचा विचार करत असाल तर फेब्रुवारी ते जुलै दरम्यान याची लागवड करण्याचा विचार करा. वेलचीची मुळे कशी पसरतात, म्हणून १२-१६ इंच खोल आणि रुंद भांडे निवडा. माती हलकी, सेंद्रिय व निचरा करणारी असावी. त्यासाठी बागेची माती, शेणाचे खत आणि कोकोपेट समान प्रमाणात मिसळावे. बियाण्यापासून वाढणे थोडे कठीण आहे, म्हणून रोपवाटिकातून लागवड करणे सोपे आहे. बियाण्यापासून वाढवायचे असेल तर ताजे बियाणे घ्या आणि त्यांना २४ तास पाण्यात भिजवून पेरावे. स्प्राउट्स बाहेर येण्यास ३-५ आठवडे लागू शकतात. वेलचीला हलकी सावली आवडते, कडक सूर्यप्रकाश आवडत नाही. दररोज ३-४ तास अप्रत्यक्ष सूर्यप्रकाश पुरेसा आहे. माती नेहमी किंचित ओलसर ठेवा, परंतु पाणी साचून राहू देऊ नका. दर २०-२५ दिवसांनी गांडूळ खत किंवा शेणाचे खत लावावे. वाळलेली पाने वेळोवेळी कापावी.

वेलचीचे रोप २-३ वर्षांत फळ देण्यास सुरवात करेल. जेव्हा हिरवे आणि भरलेले दिसतात तेव्हा ते तोडून घ्या. सावलीत कोरडे ठेवा. घरी वेलची वाढवल्याने तुम्हाला नेहमी शुद्ध आणि ताजे मसाले मिळतात. ह्या बागेतील हिरवळ वाढते आणि वातावरणही चांगले असते . चव आणि सुगंध दोन्ही वाढविण्यासाठी आपण ते चहा आणि मिठाईमध्ये जोडू शकता. थोडी काळजी घेतली तर वेलचीचे रोप वर्षानुवर्षे फळ देते.

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### राज तंत्र

'उद्दीष्ट' साध्य करण्या
ते बदलती धोरणांची दिशा
बहुमताने सत्ता मिळविणे
ही असते त्यांची मनिषा..

साम दाम दंड भेद नितीचा
करोनी यथोचित वापर
पक्षबळ वाढविणे साठी
ते असती सदैव तत्पर...

करू नका केवळ काव काव
द्राक्ष हाताला लागत नाही
म्हणून आंबट आहे म्हणती
हे जगाला आहे ठाव ..!

# घनकचरा संकलन ठप्प : आजपासून कामगाराचे आमरण उपोषण

**15 दिवसांपासून अचलपूर-परतवाडा कचऱ्याच्या विळख्यात | नागरीकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर**

**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर, ( दि.21 )**- अचलपूर नगरपरिषदेत प्रशासक कार्यकाळापासून घनकचरा संकलन ठेकेदाराची देयके थकीत असल्याने वारंवार कामबंद आंदोलन होत आहेत. याच पार्श्वभूमीवर सोमवारपासून कचरा संकलन कर्मचाऱ्यांनी पुन्हा काम बंद आंदोलन छेडले असून, आज बुधवारपासून त्यांनी आमरण उपोषण सुरू केले आहे. नवनिर्वाचित नगराध्यक्षा व नगरसेवकांनी मध्यस्थी करून प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला, मात्र तो अद्याप निष्फळ ठरला आहे. परिणामी, घनकचरा व्यवस्थापनाचा प्रश्न नव्या पदाधिकाऱ्यांसाठी मोठे आव्हान ठरला आहे.




नगरपालिकेच्या ढिसाळ कारभारामुळे अचलपूरङ्कपरतवाडा शहरातील नागरिक त्रस्त झाले आहेत. मागील 10 ते 12 दिवसांपासून अनेक भागांत कचरा उचलण्यात आलेला नाही. घरगुती कचरा तसेच नाल्यांच्या सफाईतून निघालेला कचरा शहरातील विविध ठिकाणी साचला असून, दुर्गंधी पसरली आहे. डास, माशा वाढल्याने साथरोग पसरण्याचा धोका निर्माण झाला असून, नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न ऐरणीवर आला आहे.

कचरा संकलनासाठी नेमलेल्या ठेकेदाराला नगरपरिषदेकडून सुमारे 20 लाख रुपयांचे बिल अदा करण्यात आले, मात्र कर्मचाऱ्यांना केवळ पाच-पाच हजार रुपये दिल्याचा आरोप कामगारांनी केला आहे. त्यामुळे संतप्त कर्मचाऱ्यांनी घंटागाड्या व ट्रॅक्टर उभे करून संपूर्ण कामकाज ठप्प केले आहे. गेल्या आठ दिवसांपासून संप सुरू असतानाही प्रशासनाकडून कोणतीही पर्यायी व्यवस्था करण्यात आलेली नाही, ही बाब चिंताजनक मानली जात आहे. घनकचरा संकलन करणाऱ्या कर्मचाऱ्यांना गेल्या 100 दिवसांपासून पगार मिळालेला नसल्याचेही समोर आले आहे. प्रशासन व ठेकेदार यांच्यातील समन्वयाच्या अभावामुळे कर्मचाऱ्यांचे हाल होत असून, त्याचा थेट फटका नागरिकांना बसत आहे.

**काय म्हणतात नवनिर्वाचित नगराध्यक्ष**

दरम्यान, नगराध्यक्षा रुपाली माथने यांनी सांगितले की, अद्याप पहिली सर्वसाधारण सभा झालेली नसली तरी पहिल्याच सभेत घनकचरा, पाणीपुरवठा व आरोग्याचे प्रश्न प्राधान्याने निकाली काढले जातील. तत्पूर्वी तात्काळ उपाययोजना करून बुधवारपासून शहरातील घनकचरा व्यवस्थापनातील कोंडी फोडण्यात येईल. असेही त्या म्हणाल्या.

# 22 आस्थापनांची तपासणी, 5,500 रुपयांचा दंड वसूल

**प्लास्टिक जप्ती व दंडात्मक मोहीम**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 21 )** - अमरावती महानगरपालिका क्षेत्रात प्रतिबंधित प्लास्टिकविरुद्ध कारवाई अधिक तीव्र करण्यात आली असून, आयुक्त सौम्या शर्मा चांडक व अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांच्या आदेशानुसार तसेच वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव व झोन क्र. 3 च्या सहाय्यक आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली 21 जानेवारी 2026 रोजी दस्तूरनगर ते यशोदानगर रोड परिसरात प्लास्टिक जप्ती व दंडात्मक मोहीम राबविण्यात आली.



या मोहिमेदरम्यान एकूण 22 आस्थापनांची तपासणी करण्यात आली. बहुतांश ठिकाणी कापडी, कागदी पिशव्या व 51 मायक्रॉनपेक्षा जास्त जाडीच्या प्लास्टिकचा वापर होत असल्याचे आढळून आले. मात्र, पियुष कृपा इंटरप्रायझेस येथे प्रतिबंधित प्लास्टिक सापडल्याने ?5,000 दंड ठोठावण्यात आला. तसेच बिकानेर मिठाई या आस्थापनामध्ये डस्टबिन नसल्याने ?500 दंड आकारण्यात आला. एकूण ?5,500 रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

या मोहिमेत प्लास्टिक निर्मूलन नोडल अधिकारी विनोद टांक, ज्येष्ठ स्वास्थ निरीक्षक कुंदन हडाले, स्वास्थ निरीक्षक व कर्मचारी सहभागी होते. महानगरपालिकेने नागरिक व व्यापाऱ्यांना प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर टाळून स्वच्छतेच्या नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे.

# पोलीस अधिक्षक कार्यालयाच्या निष्क्रियतेवरही बोट

**पोलीस संरक्षण व कारवाईची आयोगाकडे मागणी**

**महासागर प्रतिनिधी**

**धामणगाव रेल्वे ,( दि.21 )**- मानवाधिकार उल्लंघनाच्या या प्रकरणात केवळ स्थानिक पोलीस ठाणेच नव्हे तर वरिष्ठ पोलीस प्रशासनाच्याही भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. तक्रारदार सागर शिंदे यांनी दिनांक 27 डिसेंबर 2025 रोजी पोलीस अधीक्षक (ग्रामीण), अमरावती यांच्याकडे सविस्तर लेखी तक्रार सादर केली होती. तथापि, आजतागायत कोणतीही चौकशी, एफआयआर नोंद, पोलीस संरक्षण अथवा संबंधित अधिकाऱ्यांविरोधात शिस्तभंगाची कारवाई करण्यात आलेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. ही बाब वरिष्ठ स्तरावरील प्रशासकीय निष्क्रियतेचे स्पष्ट उदाहरण असल्याचे शिंदे यांनी म्हटले आहे. या संपूर्ण प्रकारामुळे भारतीय संविधानातील अनुच्छेद 14, 19 व 21 अंतर्गत




मिळणाऱ्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन झाल्याचा दावा करण्यात आला आहे. तक्रारीसोबत कथित शिवीगाळीची ऑडिओ रेकॉर्डिंग पुरावा म्हणून सादर करण्यात आली आहे. राज्य मानवाधिकार आयोगाकडे स्वतंत्र व निष्पक्ष चौकशीचे आदेश देणे, संबंधित पोलीस अधिकाऱ्यांविरोधात विभागीय व कायदेशीर कारवाई करणे, तक्रारदार व त्यांच्या कुटुंबाला तात्काळ पोलीस संरक्षण देणे तसेच मानवाधिकार उल्लंघनाबद्दल योग्य भरपाई देण्याची मागणी करण्यात आली आहे.

# 25 हजारांची 'मागणी' आणि अधिकाऱ्यांची मौन भूमिका?

**ग्रॅच्युइटी प्रकरणाला नवा वळण**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 21 )** वयोवृद्ध कादर खान सत्तार खान यांच्या ग्रॅच्युइटी प्रकरणाने आता गंभीर वळण घेतले आहे. खात्रीलायक सूत्रांनुसार, जिल्हा परिषद स्तरावरून ग्रॅच्युइटीचा धनादेश काढण्यासाठी तब्बल 25 हजार रुपयांची कथित मागणी करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. या आरोपामुळे प्रकरणाची गंभीरता आणखी वाढली आहे.

कोर्टाचा स्पष्ट आदेश, रिकव्हरी सर्टिफिकेट आणि कोणतीही स्थगिती नसतानाही अद्याप रक्कम अदा करण्यात आलेली नाही. त्यातच लाचेची मागणी झाल्याचा आरोप झाल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. या संदर्भात जिल्हा परिषद अमरावतीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संगीता माहपात्रा यांची प्रतिक्रिया घेण्याचा वारंवार प्रयत्न करण्यात आला; मात्र फोन करूनही कोणताही प्रतिसाद मिळू शकला नाही. अधिकृत भूमिका स्पष्ट न झाल्याने नागरिकांमध्ये संभ्रम आणि नाराजी वाढत आहे. माझ्या हक्काच्या पैशासाठी मला लाच द्यावी लागते, हे वेदनादायक आहे, अशी भावनिक प्रतिक्रिया कादर खान यांनी व्यक्त केली.

# पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकीच्या शिरपेचात मानाचा तुरा




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 21 )** - नुकत्याच दिल्ली येथे पार पडलेल्या 12 व्या राष्ट्रीय टांग सू डो अजिंक्यपद स्पर्धेत पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालय, अमरावती येथील विद्युत अभियांत्रिकी विभागाची विद्यार्थिनी कु. मल्लेश्वरी राजपूत हिने उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले. तिच्या या यशामुळे महाराष्ट्र संघाला प्रथम क्रमांकाची ट्रॉफी मिळाली असून राज्यासह महाविद्यालयाचा गौरव वाढला आहे.

कु. मल्लेश्वरी राजपूत ही विद्युत अभियांत्रिकी शाखेची विद्यार्थिनी असून तिने कठोर परिश्रम, सातत्य आणि शिस्तीच्या जोरावर हे यश संपादन केले. तिच्या कामगिरीमुळे क्रीडा आणि शैक्षणिक क्षेत्रात तिचा विशेष सन्मान करण्यात येत आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष, संचालक डॉ. पी. एम. खोडके, प्राचार्य पी. एम. जावंधिया, उपप्राचार्य डॉ. मो. झुहैर, विभागप्रमुख डॉ. एस. बी. वरकड, सहाय्यक विभागप्रमुख डॉ. पी. आर. राणे तसेच विभागातील सर्व प्राध्यापकांनी तिचे अभिनंदन केले. या यशामुळे महाराष्ट्रातील टांग सू डो खेळाडूंना नवी प्रेरणा मिळाली असून भविष्यात आंतरराष्ट्रीय स्तरावरही ती यश मिळवेल, अशा शुभेच्छा देण्यात आल्या.

# कृत्रिम वाळू निर्मितीसाठी परवाना प्रक्रिया सुरू

**अर्ज करण्याचे आवाहन**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.21 )** - नैसर्गिक वाळूला पर्याय म्हणून एम-सॅण्ड (कृत्रिम वाळू) निर्मितीस चालना देण्यासाठी जिल्ह्यात परवाना प्रक्रिया सुरू करण्यात आली असून इच्छुक व्यक्ती व संस्थांनी जिल्हाधिकारी कार्यालयात अर्ज करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे. मंजूर खाणपट्टाधारक, तात्पुरते परवानाधारक तसेच खाणपट्टा नसूनही एम-सॅण्ड युनिट स्थापन करू इच्छिणाऱ्या व्यक्ती व संस्था या योजनेचा लाभ घेऊ शकतात.

अर्जासोबत गट क्रमांक, नकाशा, सातबारा उतारा, आधार व पॅन कार्ड, अर्ज फी 500 रुपये, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे 'कन्सेंट टू इस्टॅब्लिश' व 'कन्सेंट टू ऑपरेट' प्रमाणपत्र, 100 टक्के एम-सॅण्ड उत्पादनाबाबत हमीपत्र, दगड पुरवठ्याचा स्त्रोत, नियोजन प्राधिकरणाची ना-हरकत, उद्योग आधार नोंदणी व व्यापारी परवाना आवश्यक आहे. योजनेअंतर्गत औद्योगिक प्रोत्साहन अनुदान, व्याज व विद्युत शुल्क सवलत, तसेच रॉयल्टीत प्रतिटन 200 रुपयांची सवलत देण्यात येणार आहे. यापूर्वी महाखनिज प्रणालीवर अर्ज केलेल्यांनीही नव्याने अर्ज करणे बंधनकारक आहे. अधिक माहितीसाठी गौणखजिन शाखेशी संपर्क साधावा.

# अतिक्रमणांवर हातोडा! महापालिकेची धडक मोहीम

**अतिक्रमणे हटवा, अन्यथा बुलडोजर कारवाई; नागरिकांना कडक इशारा**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 21 )**- शहरातील वाढती अतिक्रमणे ही गंभीर समस्या बनली असून त्यामुळे वाहतूक कोंडी, अपघातांचे प्रमाण वाढत आहे, तसेच नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर मोठा परिणाम होत आहे. रस्त्यांच्या कडेला, फूटपाथवर व मोकळ्या जागांवर पक्के शेड उभारून करण्यात आलेली अतिक्रमणे शहराच्या सौंदर्यालाही बाधा पोहोचवत आहेत. या पार्श्वभूमीवर महानगरपालिका आयुक्त सौ. सौम्या शर्मा चांडक यांच्या निर्देशानुसार शहरात अतिक्रमण हटाव मोहीम तीव्र करण्यात आली आहे.





महानगरपालिकेच्या वतीने मंगळवार, 21 जानेवारी 2026 रोजी जेसीबी व तीन ट्रकच्या सहाय्याने चित्रा चौक, इतवारा बाजार, टांगा पडाव, चांदनी चौक, नागपुरी गेट, जमील कॉलनी, वलगाव रोड, चौधरी चौक, मालवीय चौक, रेल्वे स्टेशन चौक परिसरातील अतिक्रमणांवर कारवाई करण्यात आली. या मोहिमेदरम्यान अनेक अतिक्रमणधारकांनी स्वत:हून आपली अतिक्रमणे हटविण्यास सुरुवात केली, तर काही ठिकाणी महानगरपालिकेच्या पथकाने थेट कारवाई करून अडथळे दूर केले.

जोपर्यंत शहरातील सर्व प्रमुख रस्ते व फूटपाथ मोकळे होत नाहीत, तोपर्यंत ही मोहीम सुरूच राहणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. अतिक्रमणे स्वयंस्फूर्तीने न हटविल्यास बुलडोजरद्वारे कारवाई करण्यात येईल, तसेच संबंधितांवर कायदेशीर कार्यवाहीही केली जाईल, असा इशाराही देण्यात आला आहे. लवकरच शहराच्या मुख्य बाजारपेठेतील, विशेषत: कापड बाजारातील अतिक्रमणांवरही विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेचा, शहराच्या सुव्यवस्थेचा आणि वाहतुकीच्या सुलभतेचा विचार करूनच ही कारवाई हाती घेण्यात आल्याचे महानगरपालिका प्रशासनाने सांगितले. सदर मोहिमेत अतिक्रमण निर्मूलन पथक प्रमुख योगेश कोल्हे, निरीक्षक अन्सार अहमद, संदीप सोनोने, अतिक्रमण विभागातील कर्मचारी, पी.एस.आय. गुलवाडे व पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

# मनरेगा बचाव यात्रेचा मेळघाटात एल्गार

**24 जानेवारीला चुरणी येथे आदिवासी भवनात जाहीर सभा**

**चुरणी, ( दि. 21 )** - मेळघाटातील आदिवासी बहुल भागात मनरेगा योजनेच्या संरक्षणासाठी काढण्यात येणाऱ्या 'मनरेगा बचाव यात्रे'ची सभा येत्या 24 जानेवारी रोजी चुरणी येथील आदिवासी भवनात होणार आहे. या सभेचे आयोजन चिखलदरा तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे. मनरेगाच्या माध्यमातून ग्रामीण व आदिवासी मजुरांना मिळणाऱ्या रोजगाराच्या हक्कासाठी ही लढाई असल्याचे आयोजकांनी सांगितले.

मनरेगा योजनेमुळे ग्रामीण भागात किमान 100 दिवसांचा रोजगार, नियमित मजुरी आणि स्थलांतराला आळा बसण्यास मोठा आधार मिळत होता. मात्र सध्या निधीअभावी कामे मंजूर न होणे, मजुरी वेळेवर न मिळणे व जॉबकार्डधारकांना काम न मिळणे अशा गंभीर समस्या मेळघाटात निर्माण झाल्या आहेत. याचा थेट परिणाम आदिवासी कुटुंबांच्या उपजीविकेवर होत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे.

सभेत कामांची तातडीने मंजुरी, प्रलंबित मजुरीचे पैसे अदा करणे, स्थानिक पातळीवर जास्तीत जास्त कामे सुरू करणे व स्थलांतर रोखणे या प्रमुख मागण्या मांडल्या जाणार आहेत. मनरेगा ही ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असल्याने ती कमकुवत होऊ देणार नाही, असा निर्धार आयोजकांनी व्यक्त केला आहे. चिखलदरा तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सहदेव बेलकर यांनी सर्व जॉबकार्डधारक व मजुरांना सभेत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

# चिखलदऱ्यात बिबट्यांचा मुक्त संचार

**दिलदार ढाबा परिसरात सीसीटीव्हीत दोन बिबट्यांची हालचाल कैद**

**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी( दि. 21 )** - चिखलदरा येथील वन उद्यानाजवळ असलेल्या दिलदार ढाबा परिसरात सोमवारी रात्री दोन बिबट्यांनी मुक्त संचार केल्याची घटना समोर आली आहे. ही संपूर्ण हालचाल ढाब्यात लावण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून, त्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. बिबट्यांच्या उपस्थितीनंतर काही कुत्रे गायब झाल्याची माहितीही नागरिकांकडून देण्यात आली आहे.





या घटनेमुळे स्थानिक नागरिकांसह पर्यटकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषत: रात्रीच्या वेळी बिबट्यांची वर्दळ वाढल्याने ढाबा चालक, कर्मचारी आणि आसपासच्या रहिवाशांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी वनविभागाने गस्त वाढवावी व आवश्यक त्या खबरदारीच्या उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

दरम्यान, चिखलदरा परिसरात वाघ, बिबट्या व अस्वल यांचा वाढता संचार ही वन्यजीव संवर्धनाच्या दृष्टीने सकारात्मक बाब मानली जात आहे. अलीकडे वाघ व बिबट्यांचे दर्शन अधिक प्रमाणात होत असल्याने वन्यजीव प्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण असून, त्यामुळे चिखलदऱ्यात पर्यटकांची संख्या वाढण्याची शक्यता आहे. पर्यटनवाढीमुळे स्थानिकांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होणार असल्याने ही बाब स्थानिकांसाठी दिलासादायक ठरत आहे.

वनविभागाचे वर्तुळ अधिकारी विनोद कासदेकर यांनी नागरिक व पर्यटकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. या परिसरात वाघ, बिबट्या व अस्वल यांचा संचार असल्याने उशिरा रात्री एकटे फिरू नये. पर्यटकांनीही रात्रीच्या वेळी एकट्याने किंवा जंगलालगतच्या भागात भटकंती टाळावी, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

# दुर्गम भागात घराघरांपर्यंत सौरऊर्जेचा लाभ

**मेळघाटातील आदिवासी पाड्यांवर 'स्मार्ट' सोलर योजनेची थेट जनजागृती**

**महावितरणची विशेष मोहीम**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती ( दि. 21 )** - राज्य शासनाच्या स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफटॉप सोलर योजनेचा लाभ मेळघाटातील दुर्गम व आदिवासी भागांपर्यंत पोहोचावा, यासाठी महावितरणने व्यापक जनजागृती मोहीम हाती घेतली आहे. कार्यकारी अभियंता प्रदीप अंधारे यांच्या पुढाकारातून थेट आदिवासी पाड्यांवर जाऊन नागरिकांशी संवाद साधत योजनेची माहिती देण्यात आली.



राज्य शासनाने आर्थिकदृष्ट्या दुर्बल, दारिद्र्यरेषेखालील तसेच 100 युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या कुटुंबांसाठी ही योजना सुरू केली आहे. 95 टक्क्यांपर्यंत अनुदानावर 1 किलोवॅट क्षमतेचा सौरऊर्जा प्रकल्प घरांच्या छतावर बसविला जाणार आहे. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेसह राज्य शासनाचे अतिरिक्त अनुदान मिळाल्याने वीजबाबत स्वयंपूर्णतेचा उद्देश साध्य होणार आहे. मुख्य अभियंता अशोक साळुंके व अधीक्षक अभियंता दीपक देवहाते यांच्या मार्गदर्शनाखाली अचलपूर विभागामार्फत विशेष पथके स्थापन करण्यात आली. या पथकांनी धारणी व चिखलदरा तालुक्यातील बैरागड, कुटुंगा, निमाढाणा, काटकुंभ, चुरणी, हरिसाल, सेमाडोह आदी गावांसह वाडी-वस्त्या व पाड्यांवर भेट देत जनजागृती केली. विशेष बाब म्हणजे रोजगार हमी योजनेअंतर्गत काम सुरू असलेल्या ठिकाणीही जाऊन माहिती देण्यात आली. बॅनर, भित्तीपत्रके व माहितीपत्रकांचे वाटप करून अर्ज प्रक्रियेचे मार्गदर्शन करण्यात आले. दरम्यान, मोर्शी विभागातही विशेष शिबिरे घेऊन अधिकाधिक नागरिकांनी योजनेत सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

RNINO-46975/1985
Dainik Mahasagar Amravati
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak; printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no. 9518934504.
Group Editor-in-Chief and Managing Director - Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak.
आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७५/१९८५
महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक, अमरावती, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक


# अस्मिता

## समाजसमर्पिता सुनीता कृष्णन

मानिनी

सुनीता कृष्णनचा जन्म १९७२ मध्ये बंगलोरमध्ये झाला. लहान वयातच तिला गावातील गरजू मुलांना मदत करायची इच्छा होती. सुनीताने पर्यावरणशास्त्रात बी. ए. केले आणि नंतर मानसशास्त्र व समाजशास्त्र या विषयात पदवी मिळवली. समाजातील दुर्बल, अपहृत किंवा लैंगिक गुलाम बनलेल्या महिला आणि मुलींसाठी आपले आयुष्य समर्पित केले आहे.

एकदा सुनीता मुलांना शिकवण्यासाठी गावात कार्यक्रम आयोजित करत होत्या. आठ पुरुषांच्या एका गटाला एका स्त्रीने असे कार्य करणे आवडले नाही. त्या आठ पुरुषांनी त्यांच्यावर बलात्कार केला आणि तीव्र मारहाण केली. त्यावेळी सुनीता यांचा एक कान अंशतः बहिरा झाला. परंतु सुनीता खचल्या नाहीत. त्यांनी काम बंदही केले नाही. १९९६ मध्ये त्यांचा भाऊ जोस वेटिटाटिल आणि काही मित्रांच्या सहकार्याने सुनीता यांनी प्रज्वला संस्थेची स्थापना केली. ही संस्था हैदराबादमध्ये सुरु झाली. मानवी तस्करीतून वाचलेल्या महिलांना व मुलींना सुरक्षित आश्रय देणे हे या संस्थेचे मुख्य उद्दिष्ट आहे. महिलांना शिक्षण व कौशल्ये शिकवणे आणि त्यांना समाजात पुन्हा आत्मनिर्भर बनवणे हे कार्य या संस्थेतर्फे केले जाते. या संस्थेत आश्रयगृहे, शिक्षण केंद्रे, कौशल्य प्रशिक्षण केंद्रे आणि पुनर्वसन कार्यक्रम चालतात. या कार्यक्रमांद्वारे सेक्स-गुलामीत काम केलेल्या महिलांना किंवा मुलींना त्यांच्या परिस्थितीतून बाहेर येण्यास मदत मिळते. लहान मुलींच्या शिक्षणासाठी एका वेश्यालयाचे शाळेत रूपांतर करूनच या संस्थेचा प्रवास सुरु झाला आहे.



सुनीता कृष्णन यांनी आजपर्यंत ८,००० मुलींना वाचवण्यात यश मिळवले आहे. वाचवलेल्या या मुलींचे पुनर्वसन केले जाते. त्यासाठी आश्रयगृहे उभारली गेली आहेत आणि एक कारखाना सुरु केला गेला आहे.तिथे मुलींना लाकूडकाम, वेल्डिंग अशा कौशल्यांचे प्रशिक्षण दिले जाते.सुनीता यांना पद्मश्री हा सर्वोच्च नागरी सन्मान, मदर टेरिसा अवॉर्ड, सोशल जस्टिस और लिम्का बुक ऑफ रिकॉर्ड्स द्वारा पीपल ऑफ द इयर अवॉर्ड तसेच अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत. सुनीता यांनी समाजात जागरुकता निर्माण केली. कायदेशीर बदल घडवून आणले आणि हजारो महिलांचे जीवन बदलले. चिकाटी, धैर्य आणि निःस्वार्थ सेवा यामुळे समाजात खरोखर बदल घडवता येतो हे त्यांनी सिद्ध केले आहे.

**१९९६ मध्ये त्यांचा भाऊ जोस वेटिटाटिल आणि काही मित्रांच्या सहकार्याने सुनीता यांनी प्रज्वला संस्थेची स्थापना केली. ही संस्था हैदराबादमध्ये सुरु झाली. मानवी तस्करीतून वाचलेल्या महिलांना व मुलींना सुरक्षित आश्रय देणे हे या संस्थेचे मुख्य उद्दिष्ट आहे.**

## निवड कानातल्यांची

स्टाईल स्टेटमेंट

छानसं कानातलं तुमचं व्यक्तिमत्त्व चटकन खुलवतं. यासाठी तुमच्या चेहऱ्याला साजेसं कानातलं हवं. सध्या ऑफिस मीटिंग्ज, पार्ट्या, कौटुंबिक भेटीगाठी, सेमिनार्स हे सारं व्हर्च्युअल किंवा ऑनलाईन होत असताना कानातल्यांची निवड करताना विशेष काळजी घ्यायला हवी. योग्य प्रकारची आणि आकाराची कानातली घातली तरच तुम्ही छान दिसाल. कानातल्यांची निवड कशी करायची याविषयी...



✽ गोल चेहऱ्याच्या महिलांनी लांबुळकी किंवा डँगल प्रकारातली कानातली घालावीत. या कानातल्यांमुळे चेहऱ्याला नीट आकार येईल. तसंच फुगीर चेहरा बारीकही दिसेल. चांदबाली, बटन स्टड्स किंवा हूप्ससारखी गोलाकार कानातली टाळलेली चांगली. अशा कानातल्यांमुळे तुमचा चेहरा अधिक भरीव दिसेल.

✽ लांब आणि अरुंद चेहऱ्याच्या महिलांनी स्टड्स, हेवी झुमके, चांदबाली, शॉर्ट डँगल्स, मध्यम ते मोठ्या आकाराचे हूप्स घालायला हरकत नाही. गोलाकार कानातल्यांमुळे तुमचा चेहरा भरीव दिसू लागेल, चेहऱ्याला नीट आकार येईल.

✽ चौकोनी चेहऱ्याच्या महिला लांब आणि मध्यम आकाराची कानातली घालू शकतात. आयताकृती, गोल तसंच हूप्स हे प्रकार अशा चेहऱ्यांना चांगले दिसतात. मात्र चौकोनी आकाराची कानातली अजिबात घालू नका.

✽ अंडाकृती चेहरा असणाऱ्या महिला नशीबवानच म्हटलं पाहिजे. या महिलांना कोणत्याही आकाराची कानातली शोभून दिसतात. त्यातही त्रिकोणी आकाराची कानातली किंवा साधे स्टड्स घातल्यानंतर चिकबोन्सना अधिक उठाव येईल.

## स्वकौशल्य विकास

स्किल डेव्हलपमेंट

स्वतःचे गुण ओळखणे हे प्रत्येक स्त्रीसाठी खूप महत्त्वाचे आहे. अनेक वेळा आपल्याला नेमके काय हवे आहे आणि आपण काय करू शकतो हे महिलांना माहीत नसते. त्यांच्यात अनेक चांगले गुण असतात. पण ते गुण दडून राहतात. हे कौशल्य विकसित करण्यासाठी सर्वात आधी स्वतःकडे शांतपणे पाहणे आवश्यक आहे. आपले मन कोणत्या गोष्टीत अधिक रमते, कोणत्या गोष्टी करताना आपल्याला अधिक उत्साह वाटतो, कोणत्या गोष्टीत आपण मनापासून मेहनत घेतो हे निरीक्षणातून सहज लक्षात येते.

स्वतःला थोडा वेळ दिला आणि स्वतःशी काही वेळ मनमोकळा संवाद साधला तर आपल्याला नक्की काय आवडते, हे शोधता येते. स्त्रीने स्वतःला ओळखणे ही तिच्या विकासाची पहिली आणि सर्वात महत्त्वाची पायरी आहे. दैनंदिन जबाबदाऱ्या सांभाळताना अनेक वेळा ती स्वतःच्या भावना, क्षमता, इच्छा आणि मर्यादा यांच्याकडे दुर्लक्ष करते. पण ती शांतपणे स्वतःकडे पाहते, स्वतःला काय जमते, काय जमत नाही, कोणत्या गोष्टीत आनंद मिळतो



आणि कोणत्या गोष्टी तिला थांबवतात हे समजून घेते तेव्हा तिच्या आयुष्याची दिशा अधिक स्पष्ट होते. स्वतःला ओळखल्यानंतर बदल करणे सोपे होते. सुधारणा हवी तिथे छोटी पावले उचलता येतात. ज्या सवयी उपयोगी नाहीत त्या सोडता येतात आणि आयुष्यात उपयोग होतो त्या कौशल्यांचा विकास करता येतो.

स्वतःला ओळखल्याने स्त्री आत्मविश्वासाने निर्णय घेते.इतरांकडून मान्यता मिळावी म्हणून नव्हे, तर स्वतःच्या योग्यतेनुसार पुढे जाते. मनातील नकारात्मक आवाज ओळखून त्याऐवजी सकारात्मक विचारांची सवय लावते. वेळ, नाती, आरोग्य आणि करिअर यामध्ये संतुलन साधणेही तिला सहज शक्य होते. स्वतःवर प्रेम करणे,स्वतःला थोडा वेळ देणे, शिकण्याची तयारी ठेवणे या छोट्या सवयी मोठे बदल घडवतात. स्वतःची खरी ओळख शोधल्यावर स्त्री अधिक मुक्त, सामर्थ्यवान आणि स्वतःच्या आयुष्याची दिशा ठरवणारी बनते.



## असं खुलवा नखांचं सौंदर्य

ब्युटी टॉक

नेल आर्ट किंवा नेल पॉलिशने सजवलेली नखं खूप सुंदर दिसतात. नेल पॉलिशमुळे नखांचं बाह्य सौंदर्य खुलतं. पण पुरेशा देखभालीअभावी नखं पिवळी पडतात, तुटू लागतात. अशी नखं नेल आर्ट किंवा नेल पॉलिशमुळेही चांगली दिसत नाहीत. नखांचं सौंदर्य तसंच आरोग्य टिकवून ठेवण्यासाठी त्यांची नियमित देखभाल करायला हवी. नखांच्या देखभालीच्या या काही खास टिप्स...

✽ हात तसंच नखांलगतच्या त्वचेचं स्क्रबिंग करा. हातांवरील मळ, घाण, धूळ निघेपर्यंत स्क्रबिंग करत रहा. यासाठी चांगल्या दर्जाचा फॉईलर वापरा. नखांलगतची कोरडी त्वचा क्युटिकल्स क्लिपर्सने काढून टाका.

✽ नखांना नीट आकार दिल्यानंतर त्यावर नेल पॉलिशचा एक थर चढवा. हा थर फार जाड नसावा. हलक्या हातांनी पहिला थर द्या. नखांलगतच्या त्वचेला पेट्रोलियम जेली लावल्यामुळे या भागावर नेल पॉलिश चिकटणार नाही.

✽ फिनिशिंग टचसाठी नखांवर पारदर्शक नेल पॉलिशचा एक थर चढवा. यामुळे नखांना ग्लॉसी लूक मिळेल. शिवाय मॅनिक्योर अधिक काळ टिकून राहील.

✽ तीव्र उन्हामुळे फक्त त्वचा नाही तर नखंही खराब होतात. त्यामुळे नखांलगतच्या त्वचेला सनस्क्रीन लावता येईल.

✽ साबण किंवा डिटर्जंटच्या वापरानंतर नखांना क्रीम लावायला विसरू नका.

✽ रात्री झोपण्याआधी हातांच्या तळव्यांना तेलाने मसाज करा. यासाठी बदामाचं तेल, जोजोबा ऑईल वापरता येईल. खोबरेल तेलानेही मसाज करता येईल.

✽ नखांचं सौंदर्य खुलवण्यासाठी काही घरगुती उपायही करता येतील. बेकिंग सोडा घातलेल्या पाण्यात नखं साधारण १५ मिनिटं बुडवून ठेवा. मग कापसाने पुसून घ्या.

✽ नखांचा पिवळेपणा दूर करण्यासाठी पाण्यात थोडं लिंबू पिळून त्यात बोटं बुडवून ठेवा.



## कसं वागायचं?

एटिकेट्स अँड मॅनर्स

दिवसातला बराच काळ आपण ऑफिसमध्ये घालवतो. ऑफिसमध्ये सण, वाढदिवस साजरे होतात. त्यामुळे आपलं मनही इथे रमतं. ऑफिसमधल्या काही सहकाऱ्यांशी नुसती तोंडओळख असते तर काहींशी घट्ट मैत्री होते. काहींशी स्वभाव जुळल्याने गप्पा होतात. मग बोलता बोलता आपण बरंच काही सांगून टाकतो. मात्र ऑफिसमधल्या सहकाऱ्यांशी बोलताना काही विधीनिषेध पाळायला हवेत. सहकाऱ्यांशी बोलताना कोणती काळजी घ्यावी याविषयी...

✽ ऑफिसमधला सहकारी कितीही जवळचा असला तरी तुमच्या पगाराबद्दल त्याला काहीही सांगू नका. पगाराची माहिती दिल्यामुळे तुमची एक वेगळीच प्रतिमा तयार होते. तुम्ही ऑफिसमधली गुपितं दडवून ठेऊ शकत नाही, असं तुमच्याबद्दल म्हटलं जाऊ शकतं. शिवाय उगाचच तुलना होऊ लागते.

✽ आरोग्यविषयक तक्रारी किंवा तुम्हाला होणारा त्रास कोणालाही सांगू नका. यामुळे तुमच्याबद्दल उगाचच सहानुभूती निर्माण होऊ शकते.

✽ ऑफिसच्या तक्रारी, कामाचा ताण, कमी पगार अशा चर्चा अजिबात करू नका. तुमच्या समस्या एचआरकडे किंवा वरिष्ठांकडे मांडा. सहकाऱ्यांशी असल्या गोष्टी बोलून काहीच फायदा होणार नाही. सहकाऱ्यांजवळ कामाविषयी काहीही बोलू नका.

✽ वैयक्तिक आयुष्य फार उघड करू नका. घरातले वाद किंवा अडचणींचा पाढा वाचू नका. या गोष्टींचा फायदा घेऊन तुम्हाला त्रास दिला जाऊ शकतो.

✽ जीवनशैलीत केलेल्या बदलांबाबत बोलण्याची ऑफिस ही जागा नाही. तुमचं डाएट, व्यायाम किंवा इतर बाबी सहकाऱ्यांशी शेअर करू नका. तुमचं ब्रेक अप झालं असलं तरी याबद्दल सहकाऱ्यांना काहीच सांगू नका.

✽ इतर सहकाऱ्यांच्या तक्रारी करू नका. इतरांच्या कामातल्या उणीवा काढत बसू नका. यामुळे तुमचे इतरांशी असणारे संबंध बिघडू शकतात.

## मोगलाई आलू

रसगंधा

बटाट्याची भाजी न आवडणारा माणूस सापडणार नाही. आज काय करायचं, असा प्रश्न पडल्यावर बटाट्याची भाजी, भजी किंवा चिप्स बनवले जातात. बटाट्याची वेगळी भाजी ट्राय करायची असेल तर तुम्ही मोगलाई आलू बनवू शकता. ही वेगळी डिश प्रत्येकाला आवडेल. पाहुण्यांसाठीही ही भाजी करता येईल.



**साहित्य:** पाच बटाटे, एका कांदा, दोन टोमॅटो, अर्धा चमचा आलं-लसूण पेस्ट, अर्धा चमचा काश्मिरी मिरचीचं तिखट, अर्धा चमचा हळद, अर्धा चमचा गरम मसाला, एक चमचा क्रीम, एक कप दूध, थोडं तेल, अर्धा चमचा तूप, दोन हिरव्या मिरच्या, आठ ते दहा काजू, आणि मीठ.

**कृती :** दुधात काजू घालून पेस्ट तयार करून घ्या. गॅसवर कढई ठेवा. त्यात थोडं तेल घालून बटाटे सोनेरी रंगावर परतून घ्या. हे बटाटे बाजूला ठेवा. मोगलाई आलूसाठी शक्यतो लहान आकाराचे बटाटे घ्या. आता याच कढईत तूप घाला. गरम झाल्यावर चिरलेला कांदा घाला. सोनेरी रंगावर परतून घ्या. मग आलं-लसूण पेस्ट घाला आणि नीट परतून घ्या. यानंतर त्यात चिरलेला टोमॅटो, हळद, काश्मिरी लाल तिखट, गरम मसाला आणि चवीनुसार मीठ घाला. तेल सुटेपर्यंत शिजवून घ्या. आता यात तळलेले बटाटे घालून थोडा वेळ शिजवून घ्या. साधारण पाच मिनिटांनी यात काजूमिश्रित दूध घाला. चार ते पाच मिनिटं शिजू द्या. शेवटी क्रीम घालून मिसळून घ्या. गॅस बंद करा. शेवटी कोथिंबिर घालून सजवा. मोगलाई आलू पराठा, पुरी, पोळीसोबत खाता येईल.

## हार्मोन्सचं संतुलन बिघडल्यास...

डाएट मंत्रा

सतत वाटणारी चिंता, ताणतणाव, एकटेपणा, स्वभावात होणारे बदल, चिडचिड, केस गळणं ही सगळी हार्मोन्सच्या असंतुलनाची लक्षणं आहेत. शरीराच्या विविध कार्यांमध्ये हार्मोन्सची महत्त्वाची भूमिका असते. हार्मोन्सच्या असंतुलनामुळे अनेक समस्या निर्माण होऊ शकतात. त्यातच मासिक पाळी, गरोदरपणा तसंच रजोनिवृत्तीच्या काळात हार्मोन्सचं असंतुलन अधिक प्रमाणात वाढतं. हार्मोन्सशी संबंधित तक्रारी असल्यास आहारात थोडे बदल करायला हवेत. काही घटक, पदार्थ आहारातून वर्ज्य करायला हवेत. कोणते आहेत हे पदार्थ? जाणून घेऊ.

✽ हार्मोन्सच्या असंतुलनात मिरची, वांगी, बटाटा, टोमॅटो यांचं प्रमाण कमी करायला हवं. या भाज्यांच्या सेवनामुळे शरीरावर सूज येऊ शकते. यासोबतच ब्रोकोली, फ्लॉवर, केल अशा भाज्यांमुळेही हार्मोन्सचं असंतुलन वाढू शकतं.



✽ लाल मांसात संतृप्त तसंच हायड्रोजनीकृत चरबीयुक्त घटक असतात. त्यामुळे हार्मोन्सचं संतुलन बिघडल्यावर लाल मांस खाणं टाळायला हवं. डबाबंद मांसही खाऊ नये. याऐवजी मासे किंवा अंडी खाता येतील. माशातली ओमेगा ३ फॅटी ॲसिड्स तसंच दाह कमी करणारे गुणधर्म लाभदायी ठरतात.

✽ स्टिविया नामक नैसर्गिक स्वीटनर मिळतो. स्टिविया ही नैसर्गिक साखर मानली जाते. गरोदर महिला तसंच हार्मोन्सच्या असंतुलनाची समस्या असेल तर तुम्ही स्टिविया हा पदार्थ खाऊ नका.

✽ सर्वसाधारणपणे सोयाबिन तसंच सोयाबिनची उत्पादनं आरोग्याच्या दृष्टीने चांगली असतात. मात्र हार्मोन्सचं असंतुलन असेल तर तुम्ही सोयाबिनयुक्त पदार्थ टाळायला हवेत.

✽ दुग्धजन्य उत्पादनांमध्ये भरपूर पोषक घटक असतात. दूध तसंच दुग्धजन्य उत्पादनं कॅल्शियमचा चांगला स्रोत आहेत. मात्र या उत्पादनांमुळे हार्मोन्सचं असंतुलन होऊ शकतं. त्यामुळे या उत्पादनांचं सेवनही कमी प्रमाणात करायला हवं.

## मुलांच्या मोबाईलची सुरक्षा

टेक्नो टिप्स

आजच्या काळात मोबाईल मुलांपासून दूर ठेवणे अशक्यच आहे. मोबाईलवर अनेक आकर्षक साईट्स सहजपणे उघडल्या जातात. त्यात चुकीची माहिती, अनावश्यक व्हिडीओ किंवा धोकादायक लिंक्सही असू शकतात. त्यापासून मुलांचे संरक्षण करण्यासाठी, मुलांनी किती वेळ फोन वापरावा यावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि अनावश्यक गोष्टींपासून मुलांचा बचाव करण्यासाठी काही ॲप्स आहेत. मुलांचा स्क्रीन टाईम, ॲप वापर, अनावश्यक ॲप्स ब्लॉक करण्यासाठी गुगल फॅमिली लिंक हे ॲप वापरता येते. पालकांच्या आणि मुलांच्या फोनवर फॅमिली लिंक इन्स्टॉल करावे. मुलाचे स्वतंत्र गुगल खाते तयार करावे किंवा त्यांचे आधीचे खाते असेल तर त्या लिंकला जोडून घ्यावे. त्यानंतर तुम्ही वेळेचे नियंत्रण, ॲप्सची परवानगी, इंटरनेट फिल्टर आणि स्लीप टाईम सेट करू शकता. नॉर्टन फॅमिली ॲपमुळे पालकांना वेबसाईट फिल्टर करता येतात. मुलांनी मोबाईलवर कोणत्या गोष्टी शोधल्या याचा इतिहास तपासता येतो. यासाठी प्रथम हे ॲप इन्स्टॉल करून पालक




खाते तयार करावे.मुलाच्या डिव्हाईसमध्ये चाईल्ड मोड सक्रिय करावा. त्यानंतर तुम्ही मुलांनी कोणत्या वेबसाईट्स पाहाव्या आणि कोणत्या पाहू नये हे सेट करू शकता. या ॲपमुळे मुलांनी कोणते शब्द शोधले, कोणते व्हिडीओ पाहिले याचे निरीक्षण करता येते. फायरवॉल आणि जाहिरात-नियंत्रण ॲप्समुळे अनिष्ट जाहिरातींवर नियंत्रण करता येते. चुकीच्या लिंक्स आणि असुरक्षित साईट्स ब्लॉक करता येतात. ॲप सुरु केल्यावर इंटरनेट फिल्टर सक्रिय करावे. मुले ज्या साईट्स उघडतात, त्यातील असुरक्षित दुवे हे ॲप स्वतःच अडवते. तर यूट्यूब किड्स हे ॲप मुलांनी कोणते व्हिडीओ पाहावेत आणि कोणते पाहू नयेत यावर नियंत्रण ठेवते. त्यासाठी पालकांनी पालक मोड सेट करावा आणि मुलांचे वय निवडावे.

मुलांची मोबाईल सुरक्षा राखण्यासाठी घरात मोबाईल वापराचे नियम थोडक्यात ठरवणे आवश्यक आहे.रात्री झोपण्याआधी मोबाईल मुलांपासून दूर ठेवावा.पासवर्ड, ओटीपी, फोटो किंवा व्हिडीओ शेअर करू नयेत हे मुलांना समजावून सांगितले पाहिजे. अनोळखी व्यक्तींकडून आलेले मेसेज, गेम लिंक किंवा ऑफर्स कधीही उघडू नयेत हे त्यांना शिकवले पाहिजे. आजच्या आधुनिक जगात राहताना अशी टेक्नोस्किल्स माहिती हवीच.

स्कीन केअर

### ग्रीन टी मास्क



चेहऱ्यावरील मुरुमं, पुटकुळ्या दूर करण्यासाठी तुम्हाला महागडे उपाय करण्याची गरज नाही. तुम्ही घरात उपलब्ध असणाऱ्या घटकांपासून स्क्रब, मास्क तयार करू शकता. तुमच्या घरात ग्रीन टी असेल तर पटकन फेस मास्क तयार करता येईल. ग्रीन टी आणि मध यांचा वापर करून मास्क तयार करा. यासाठी एक ग्रीन टी बॅग, एक चमचा मध, एक कप गरम पाणी घ्या. गरम पाण्यात ग्रीन टी बॅग बुडवून ठेवा. साधारण तीन मिनिटांनी बाहेर काढा. आता ही टी बॅग कापून त्यातून ग्रीन टीची पानं काढा. एका वाटीत मध, ग्रीन टी बुडवलेलं पाणी आणि ग्रीन टीची पानं घ्या आणि मिश्रण तयार करा. हे मिश्रण चेहऱ्याला लावा. साधारण २० मिनिटांनी धुवून टाका. या उपायाने चेहऱ्यावरील डाग तसंच मुरुमं कमी व्हायला मदत होईल.

स्मार्ट टिप्स

### दूर करा स्ट्रेचमार्क्स



वजन कमी केल्यानंतर महिलांच्या शरीरावर स्ट्रेच मार्क्स पडतात. या खुणा चांगल्या दिसत नाहीत. हे स्ट्रेच मार्क्स कमी करता येतात तसंच पूर्णपणे घालवताही येतात. सुरुवातीच्या टप्प्यात लाल आणि गुलाबी रंगाचे स्ट्रेच मार्क्स असतात. मग ते चंदेरी किंवा पांढरट दिसू लागतात. वेळेत उपचार घेतल्यास या खुणा निघून जातात. वैद्यकीय उपचारांनी स्ट्रेच मार्क्स दूर करता येतील. यासोबतच घरगुती उपायही आहेत. डाएट करत असाल तर उपाशी राहू नका. फळं आणि भाज्यांचं सेवन करा. भरपूर पाणी प्या. आहारात झिंक तसंच क जीवनसत्त्व असायला हवं. यामुळे स्ट्रेचमार्क्स पडणार नाहीत.

किचन टिप्स

### किड्यांपासून करा बचाव



मैदा, बेसन किंवा रव्यात काही काळानंतर किडे होऊ लागतात. हे छोटे किडे काढताही येत नाहीत. मग हे पदार्थ टाकून द्यावे लागतात. मात्र पदार्थांमध्ये किडे लागू नयेत म्हणून उपाय करता येतील. बेसन, रवा किंवा मैद्याच्या डब्यात तमालपत्र किंवा कडुनिंबाची पानं ठेवा. यामुळे किडे होणार नाहीतच शिवाय हे पदार्थ ओलसर होणार नाहीत. हे पदार्थ स्टील किंवा काचेच्या हवाबंद डब्यात ठेवा. चांगल्या दर्जाच्या प्लास्टिक कंटेनरचा वापरही करता येईल. काही पदार्थ फ्रीजमध्येही ठेवता येतील. रवा भाजूनही ठेवता येईल.

# कुठलाच नेता पक्षाचा मालक नाही!

## शिंदे गट म्हणजे एमआयएम बेईमान, महाराष्ट्रद्रोही...



■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २१ :
शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेशी युती करण्याच्या मुद्यावरून राज ठाकरे यांच्या नेतृत्वातील मनसेला खडेबोल सुनावले आहेत.

शिंदे गट म्हणजे मराठी माणसांतील एमआयएम, बेईमान व महाराष्ट्रद्रोही आहे. त्यामुळे त्यांच्यासोबत जाणारेही याच विशेषणांना पात्र ठरतात, असे ते म्हणालेत. या प्रकरणी त्यांनी कल्याण डोंबिवलीत शिंदे गटाशी युती करणाऱ्या मनसेच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांवर निलंबनाची कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

मनसेचे माजी आमदार राजू पाटील यांनी बुधवारी कल्याण डोंबिवली महापालिकेत शिंदे गटाला पाठिंबा देण्याची घोषणा केली. मनसेने महापालिका निवडणुकीत ठाकरे गटाशी युती करत शिंदे गटाविरोधात आरोपांची राळ उठवली होती. त्यानंतर लगेचच मनसेने शिंदे गटाला पाठिंबा दिल्यामुळे ठाकरे बंधूंच्या युतीत एकच खळबळ माजली आहे.

या पार्श्वभूमीवर संजय राऊत यांनी मनसेवर टीकेची झोड उठवली आहे. ते म्हणाले, आमची भूमिका फार वेगळी व कडवट आहे. ज्यांनी महाराष्ट्राशी, बाळासाहेब ठाकरेंशी, मराठी माणसांशी गद्दारी व बेईमानी केली, त्यांच्याशी कोणत्याही प्रकारची राजकीय व अन्य संबंध ठेवायचे नाहीत.

महाराष्ट्राच्या गद्दारांना मदत होईल अशी भूमिका घ्यायची नाही. सत्ता येते व सत्ता जाते. आम्ही सत्तेसाठी हपापलेले लोक नाही. स्वतः राज ठाकरेही नाहीत. त्यामुळे आमच्या भूमिका स्पष्ट आहेत. कल्याण डोंबिवलीचा विषय हा समोर आला आहे. तो अत्यंत चिंताजनक आहे. त्यांच्या मते, हा स्थानिक पातळीवरील निर्णय आहे. असू शकेल. पक्षाच्या मूळ ध्येयधोरणांशी प्रतारणा करून कोणत्याही पक्षाचे स्थानिक म्हणवून घेणारे नेतृत्व विपरित भूमिका घेत असेल तर पक्ष नेतृत्वाने त्याच्याविरोधात कारवाई केली पाहिजे. पक्षनेतृत्वाने त्यांच्यावर पक्षातून निलंबित करण्याची कायदेशीर कारवाई केली पाहिजे, असे ते म्हणाले.

संजय राऊत म्हणाले, काँग्रेसच्या १२ नगरसेवकांनी अंबरनाथमध्ये भाजपशी असंग केला. त्यानंतर काँग्रेसने तत्काळ त्यांच्यावर पक्षाच्या ध्येयधोरणांशी प्रतारणा केल्याचा ठपका ठेवत त्यांच्यावर कारवाई केली. त्यांना पक्षातून काढून टाकले. ही एक राजकीय व्यवस्था आहे. फक्त स्थानिक पातळीवर निर्णय झाला म्हणून हा विषय संपत नाही.

शिवसेना व मनसे हे एकत्र आहेत. त्यांनी एकत्र निवडणुका लढल्या. अशा वेळी कुणी एखाद्या चिन्हावर निवडून येऊन बेडुकउड्या मारत असतील, तर त्या संदर्भात त्यांच्या पक्षाने व नेतृत्वाने त्याच्यावर कारवाई करून महाराष्ट्राला दाखवायला पाहिजे की, या भूमिकेशी आम्ही सहमत नसल्याचे त्यांनी म्हटले आहे.

## धानोरकर - वडेट्टीवार संघर्ष टोकाला : चंद्रपूर काँग्रेसमध्ये टोकाचा वादविवाद

■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. २१ :
चंद्रपूर महापालिकेच्या निकालानंतर काँग्रेसमध्ये सत्तास्थापनापेक्षा सत्तेच्या सूत्रांवरच अधिक घमासान सुरू असल्याचं स्पष्ट चित्र आहे. नगरसेवकांच्या पळवापळवीच्या आरोपांवरून काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार आणि खासदार प्रतिभा धानोरकर यांच्यातील वाद आता उघड युद्धाच्या पातळीवर पोहोचला आहे. एका आरोपातून सुरू झालेला हा संघर्ष, प्रत्युत्तरङ्गप्रत्युत्तरातून राजकीय ज्वालामुखी बनत चालला आहे.

खासदार धानोरकर यांनी काँग्रेसचे नगरसेवक उचलून नेण्याची काय गरज होती? असा सवाल करत वडेट्टीवारांच्या निष्ठेवर थेट प्रश्नचिन्ह उभं केल्यानंतर आज वडेट्टीवारांनी आक्रमक व स्फोटक शैलीत प्रत्युत्तर दिलं.

कुठलाच नेता पक्षाचा मालक नसतो. स्वतःला मालक समजणाऱ्या नेत्याला कार्यकर्त्यांनी थोबाड रंगवले पाहिजे, असं विधान करत वडेट्टीवारांनी खळबळ उडवून दिली.

वडेट्टीवार यांनी स्पष्ट शब्दांत आरोप फेटाळताना सांगितलं की, मी कोणत्याही नगरसेवकांना आणायला गेलो नाही. ते सर्वजण स्वतःहून, स्वेच्छेने माझ्याकडे आले. उलट खासदारांच्या कार्यकर्त्यांनीच हात पकडून नगरसेवकांना नेल्याच्या तक्रारी आहेत. कोण कोणाला घेऊन गेलं हे वन टू वन विचारून सत्य बाहेर आणावं.

याचवेळी कोणीही स्वतःला पक्षाचा मालक समजू नये, असा खडा इशारा त्यांनी खासदारांना दिला. नेते येतात, जातात, पण कार्यकर्ते टिकून राहतात. त्यामुळे नगरसेवकांवर, कार्यकर्त्यांवर अन्याय होणार नाही याची जबाबदारी नेत्यांचीच असल्याचं ते ठामपणे म्हणाले.





वाद चिघळत असतानाच आज प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ नागपूरला येत असून, याच बैठकीत या संघर्षावर तोडगा निघेल, असा दावा वडेट्टीवारांनी केला. मात्र तोडगा निघतो की नव्या राजकीय रणसंग्रामाची सुरुवात होते, याकडे संपूर्ण महाराष्ट्राचं लक्ष लागलं आहे.

### महापौर काँग्रेसचाच, सत्तास्थापनेचा दावा

या सगळ्या गदारोळातही वडेट्टीवारांनी मोठा दावा करत सांगितलं की, चंद्रपूर महापालिकेत सत्तास्थापनेसाठी काँग्रेससोबत इतर पक्षांतील चार ते आठ नगरसेवक येण्यास तयार आहेत. चंद्रपूरमध्ये काँग्रेसचाच महापौर बसेल, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### बी-टीमचे आरोप आणि जुने हिशेब

मला भाजपची बी-टीम म्हटलं गेलं, पण निकालाने कोण कोणाची टीम आहे हे दाखवून दिलं, असा टोला लगावत वडेट्टीवारांनी भूतकाळही उकरून काढला.

काँग्रेसने आधी लोकसभेची उमेदवारी मलाच दिली होती. मी लढणार नव्हतो म्हणून मुलगी शिवानीसाठी उमेदवारी मागितली. त्यावेळी प्रतिभा धानोरकरांचा पक्षात उदयही झाला नव्हता,ङ्घ असं सांगत त्यांनी वादाची सुरुवात कुठून झाली हे चंद्रपूरच्या जनतेला माहीत असल्याचं ठणकावलं.

आपल्या भूमिकेचं समर्थन करताना वडेट्टीवार म्हणाले, माणसं येतात-जातात. पण मृत अवस्थेत असलेली काँग्रेस जिवंत करण्याचं काम मी केलं. जिल्हा बँक भाजपच्या ताब्यात कशी गेली, हे जनतेला माहीत आहे.

महापालिकेतील खासदारांनी दिलेल्या उमेदवारांचा पराभव का झाला, याचं उत्तर धानोरकरांनी द्यावं, अशी थेट मागणीही त्यांनी केली. हा वाद केवळ दोन नेत्यांपुरता मर्यादित नसून, तो चंद्रपूर काँग्रेसमधील नेतृत्व, नियंत्रण आणि सत्तेच्या केंद्रांवरचा संघर्ष दर्शवतो. तोडगा निघाला नाही, तर महापालिकेतील सत्ता मिळवतानाच पक्षांतर्गत जखमा अधिक खोल जाण्याची शक्यता आहे.

काँग्रेस चंद्रपूरमध्ये सत्ता उभी करणार की अंतर्गत संघर्षातच अडकून पडणार? उत्तर लवकरच समोर येणार आहे.

## ३५ हजारांची लाच घेतांना राज्य कर निरीक्षकाला अटक

■ महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि. २१ :
भंडारा : शहरात एका सरकारी अधिका ?याला लाच स्वीकारतांना अटक करण्यात आली आहे. राज्य कर निरीक्षक मनीष सहारे यांनी त्यांच्या कार्यालयात सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार यांच्याकडून ३५ हजार रुपयांची लाच स्वतः स्वीकारली.

लाच स्वीकारताना, त्याचवेळी त्यांना अटक करण्यात आली. त्यांच्या ताब्यातून मोबाइल जप्त करण्यात आला आहे. तसेच त्यांची घर झडती घेण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

बंद पडलेला जीएसटी क्रमांक पुन्हा सुरू करण्यासाठी ३५ हजारांची लाच स्वीकारणा ?या वस्तू व कर विभागाच्या (जीएसटी) राज्य कर निरीक्षकाला भंडारा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केली. ही कारवाई मंगळवारी भंडारा येथील वस्तू व कर विभागाच्या कार्यालयात करण्यात आली.

मनीष मुरलीधर सहारे (५०) असे लाचखोर अधिकाऱ्याचे नाव आहे. यातील तक्रारदार यांचा जीएसटी क्रमांक ऑक्टोबर ३०२५ पासून बंद आहे. हा क्रमांक पुन्हा सुरू करण्यासाठी त्यांनी २ नोव्हेंबर २०२५ रोजी जीएसटी विभागाला ऑनलाइन अर्ज सादर केला होता. यानंतर त्यांना जीएसटी विभाग नागपूर येथून त्यांच्या फर्मचे लेझर शीट बनवून त्याप्रमाणे चालान भरून पाठविण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यावर तक्रारदार यांनी लेझर शीट तयार करून १० हजार ४२८ रुपये चालान भरले.

यानंतर तक्रारदार यांनी वस्तू व सेवा कर विभाग भंडारा येथील राज्य कर निरीक्षक सहारे यांची भेट घेतली व त्यांचा जीएसटी क्रमांक अद्याप सुरू झाला नसल्याबाबत सांगितले. तेव्हा सहारे यांनी तक्रारदार यांना त्यांचा बंद असलेला जीएसटी क्रमांक पुन्हा सुरू करून देण्याचा मोबदला म्हणून लाचेची मागणी केली.

तक्रारदार यांची लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी १५ जानेवारी रोजी भंडारा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिली. १७ जानेवारी रोजी पथकाने सहारे यांच्या कार्यालयात पंचासमक्ष पडताळणी केली असता त्यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केल्याचे दिसून आले.

## उबाठा गटनेतेपदी किशोरी पेडणेकर

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २१ :
शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने मुंबई महापालिकेतील पक्षाच्या गटनेतेपदी किशोरी पेडणेकर यांची नियुक्ती केली आहे. किशोरी पेडणेकरांनी यापूर्वी मुंबईच्या महापौर म्हणून काम केले आहे. त्यानंतर आता पक्षाने पुन्हा एकदा त्यांच्यावर जबाबदारी सोपवली आहे.



मुंबई महापालिकेची गत १५ तारखेला निवडणूक झाली. त्यानंतर दुसऱ्या दिवशी झालेल्या मतमोजणीत भाजपला सर्वाधिक ८९ जागा मिळाल्या, तर ठाकरे बंधूंच्या युतीला अवघ्या ७१ जागांवर समाधान मानावे लागले. परिणामी, ठाकरेंची मुंबई महापालिकेवरील तब्बल २५ वर्षांची सत्ता संपुष्टात आली. या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाने आज मुंबई महापालिकेतील पक्षाच्या गटनेतेपदी किशोरी पेडणेकर यांची निवड केली. किशोरी पेडणेकर मुंबई महापालिकेच्या वॉर्ड क्रमांक १९९ मधून विजयी झाल्या होत्या. त्यांनी शिंदे गटाच्या आपल्या प्रतिस्पर्धी उमेदवार रुपल कुसळे यांचा पराभव केला.

ठाकरे गटाच्या गटनेतेपदासाठी किशोरी पेडणेकर यांच्यासह विशाखा राऊत, मिलिंद वैद्य व श्रद्धा जाधव यांची नावे चर्चेत होती. पण आज नवनिर्वाचित नगरसेवकांच्या झालेल्या बैठकीत पेडणेकर यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आला. किशोरी पेडणेकर या ठाकरे गटाच्या निष्ठावंत कार्यकर्त्या म्हणून ओळखल्या जातात. शिवसेनेत फूट पडल्यानंतर पक्षाच्या अनेक नगरसेवकांनी पक्षाला सोडचिठ्ठी दिली. पण पेडणेकरांनी खंबीरपणे ठाकरेंची साथ दिली.

## उभ्या ट्रकला दुचाकीची धडक ३० वर्षीय तरूण ठार

■ महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि. २१ :
मुंबई-कोलकाता राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ वर अपघाताचे सत्र थांबण्याचे नावच घेत नाही. रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रकला दुचाकी चालकाने मागील बाजुने जोरदार धडक दिली. त्यात ३० वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला. संकेत सपाटे असे मृत तरुणाचे नाव आहे. हा अपघात आज सकाळी झाला आहे.

संकेत सपाटे हा पहाटेच्या सुमारास त्याच्या दुचाकीने भंडारा येथून लाखनीकडे जात होता. धारगाव जवळ पोहचला असता मुंबई-कोलकाता राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ वर रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रकला त्याच्या स्कूटीने मागून जोरदार धडक दिली.

या धडकेत संकेत स्कुटीवरून खाली कोसळला. ही धडक इतकी जोरदार होती की संकेतच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. मोठ्या प्रमाणावर रक्तस्त्राव झाल्यामुळे त्याचा जागीच मृत्यू झाला. नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत संकेतला वाचवण्याचा प्रयत्न केला मात्र तोपर्यंत उशीर झाला होता. या प्रकरणी पोलिसांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवला असून पुढील तपास सुरु आहे.

## सेवा सहयोग फाऊंडेशनची पर्यावरण रक्षण चळवळ

लोकसेवार्थ



सेवा सहयोग फाऊंडेशन संस्थेअंतर्गत चाळीसगाव तालुक्यात सेवा सहयोग ग्रामोदय प्रकल्पाची सुरुवात सहा वर्षापूर्वी करण्यात आली. ग्रामोदय प्रकल्पाअंतर्गत पाणी या विषयाला धरून सर्व प्रथम कामाला सुरुवात झाली. खरेतर शिक्षण हा मूळ उद्देश होता. परंतु मुलांचं सतत शाळेत गैरहजर असण्याचे मुख्य कारण होत पालकांचे स्थलांतर. रोजगारासाठी हे स्थलांतर होत होते.

रोजगार उपलब्ध करुन द्यायचा असेल तर त्यासाठी मुख्य साधन शेती होती. शेती करायची असेल तर पाण्याची गरज होती. मुळात खानदेश हा कोरडवाहू भाग किंवा दुष्काळी पट्टा आहे. जर विद्यार्थ्यांना शाळेत आणायचं असेल तर पालकांना रोजगार उपलब्ध करून द्यावा लागेल. यासाठी शेतीसाठी पाणी उपलब्ध करुन दिले पाहिजे. म्हणून २०१७ पासून सेवा सहयोग फाऊंडेशन अंतर्गत पाणी या विषयावर कामाला सुरुवात झाली.

चाळीसगाव तालुक्यातील जवळपास ४१ गावांमध्ये पाण्याची चळवळ पोहचवली आहे. यामाध्यमातून आठशे कोटी लिटर जलसाठा निर्माण करण्यात आला आहे. यामध्ये १एक गाव एक तलाव१ ही मूळ संकल्पना राबविण्यात आली. ज्यात २१ गावांमध्ये २६ तलाव पुनर्जीवित करण्याचे काम करण्यात आले. पाण्यावर चालू झालेली ही चळवळ पूर्णपणे लोकसहभागातून चाललेली चळवळ आहे.

भुजल अभियान ही लोकसहभागातून चाललेली चळवळ सेवा सहयोग ग्रामोदय प्रकल्पाअंतर्गत सुरु केली. या चळवळीत लोकसहभागाशिवाय कुठलेही काम केले जात नाही. पाण्यासोबतच वृक्षसंवर्धनाचे काम सेवा सहयोग फाउंडेशनच्या माध्यमातून सुरु आहे. ज्यात चाळीसगाव तालुक्यात साधारणतः तीस हजार झाडांचे संवर्धन करण्याचे काम वृक्षदिंडी या उपक्रमांतर्गत सुरु आहे. या अंतर्गत शेतकरी पती-पत्नी जोडप्यांना पाच फळझाडे देऊन लोकसहभागातून लागवड केली जाते.

जलसंधारणाच्या कामामध्ये सि.सि.टि.डिप सि.सि.टि., गॅबियन बंधारे, नाला खोलीकरण, रुंदीकरण, बांधबंदिस्ती आदि कामे शेतकरी सहभागातून पाणी समिती करुन घेतात. या कामांची दखल विविध स्थरावर घेण्यात येत आहे. युनायटेड नेशन हाय लेव्हल फोरममध्ये मागिल वर्षी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे याबाबत निवेदन करण्याची संधी मिळाली होती. तसेच दिल्ली येथे जनशक्ती मंत्रालयाने जलप्रहरी पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे.

सध्या हे काम चाळीसगाव तालुक्याबरोबरच धुळे, रायगड, परभणी, लातूर जिल्ह्यातील विविध गावांमध्ये सुरु झाले आहे. या कामांसाठी विविध सामाजिक संस्था आणि सी.एस.आर मदत होत आहे.

■ ■ ■

## नेहरू नगरातील चाळकरी ते यशस्वी उद्योजक

शून्यातून विश्व



लहानपणापासूनच बांधकाम क्षेत्रात काहीतरी करावे, आपणही एखादी इमारत बांधावी, असे निलेश यांच्या मनात सातत्याने घोळत होते. त्यानुसारच महाविद्यालयीन शिक्षणातही अभियांत्रिकी शिक्षण म्हणजे सिव्हिल इंजिनिअरिंगकडे जावे, असे मनात होते. परंतु, सिव्हिल इंजिनिअरिंगला प्रवेश घेणे, बारावीनंतर लगेच शक्य झाले नाही.

त्यामुळे सुरुवातीचे जवळपास सहा महिने मेकॅनिकल इंजिनिअरिंगला प्रवेश घ्यावा लागला. परंतु, आपल्याला एखाद्या गोष्टीवर खरेच प्रेम असेल आणि तुमच्या ध्येयाबद्दल तुम्ही प्रामाणिक असाल, तर ते ध्येयच तुमचा पाठलाग करते, असे म्हणतात. तसेच काहीसे त्यांच्या बाबतीत घडले आणि त्यांना सिव्हिल इंजिनिअरिंगला प्रवेश मिळाला आणि तिथूनच निलेश यांचा बांधकाम क्षेत्राच्या दिशेने प्रवास सुरू झाला.

सुरुवातीच्या काळात कुठल्याही मध्यमवर्गीय कुटुंबात असते, तशी परिस्थिती निलेश यांच्या घरात होती. कुठलाच अनुभव गाठीशी नाही, त्यातून काहीच भांडवल नाही, अशा परिस्थितीत सुरुवातीची पाच-दहा वर्षे त्यांनी ह्यमटेरियल सप्लायह्नचे काम केले. त्यातूनही मन हे व्यावसायिकतेकडेच ओढ घेत होते. आपले शिक्षण इंजिनिअरिंगचे आणि आपण वेगळेच काम करत आहोत, ही गोष्ट खटकतही होती. पण, तेव्हा इलाज नव्हता.

निलेश कुर्ल्याच्या नेहरू नगर परिसरात वास्तव्यास असल्याने तिथे बऱ्याच इमारतींचे पुनर्विकास प्रकल्प सुरु होते. त्यातच त्यांच्या एका बालमित्राकडून ही संधी मिळाली. त्याच्याशी ते कायमच बऱ्याच गोष्टींबद्दल बोलायचो. तेव्हा त्याने त्याच्याच राहत्या इमारतीच्या पुनर्विकासाची संधी निलेश यांच्याकडे आणली; ही खूप मोठी गोष्ट होती त्यावेळी.

याच प्रकल्पापासून माझी बांधकाम व्यवसायात सुरुवात झाली.पूर्वी या क्षेत्रात आजच्याइतकी तीव्र स्पर्धा नव्हती, फार कमी बांधकाम व्यावसायिक असायचे. त्यातही मराठी व्यावसायिक तर फारच कमी. मग त्यात सर्व झोपडपट्टी पुनर्विकास यांसारख्या शासनाच्या योजनांनी अनेक बांधकाम व्यावसायिक उभे राहिले आणि व्यवसाय करू लागले. परंतु, त्यातून ग्राहकांची फसवणूक होण्याचे प्रकार वाढले होते.

आता शासनाने आणलेल्या ह्यरेराह्न वगैरेसारख्या कायद्यांनी या गोष्टींना चाप बसला आहे. बांधकाम क्षेत्रातील व्यावसायिक वाढले आहेत. या कायद्यांमुळे प्रकल्पांचे सुसूत्रीकरण शक्य होते. भांडवल उभारणीसाठीही उपयोग होतो. त्यामुळे बांधकाम क्षेत्रातील बदल पथ्यावरच पडले आहेत. मुळात स्वतः कामगारांच्या वसाहतींतून आलेलो असल्याने प्रारंभीपासूनच त्यांच्यासाठीच किंवा त्याच कामगारवगार्ला परवडतील, अशी घरे बांधण्याचेच त्यांनी ठरवले होते. यामुळे जेव्हा बांधकाम व्यवसायाला सुरुवात केली, त्यावेळी त्याच वर्गाला समोर ठेवून काम चालू केले. हीच गोष्ट यापुढे कायम ठेवली आणि याच प्रकल्पावर ते आजही काम करत आहेत

महामुंबईत बांधकाम करणे, त्यात जागेची उपलब्धता, बांधकाम खर्च या सर्व गोष्टी खरोखरच महाग झाल्या आहेत. त्यामुळे परवडणारी घरे उपलब्ध करून देणे, हे खरोखरच एक कसब आहे. जुन्या इमारतींच्या पुनर्विकासामुळे, तसेच शासनाकडून यामध्ये येणारे अडथळे दूर करण्यासाठी प्रयत्न केले जात असल्यामुळे आता परवडणारी घरे प्रत्यक्षात आणणे, हे शक्य होणार आहे. त्यासाठी ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.

या क्षेत्रात येणाऱ्या सर्वच नवीन बांधकाम व्यावसायिकांना निलेश एकच सांगू इच्छित आहेत की, या क्षेत्रात सर्वात महत्त्वाचे म्हणजे सचोटीने काम करणे, आपला दिलेला शब्द पाळणे. लोकांना काय हवे आहे आणि त्यातूनच लोकांना त्यांच्या पसंतीचे, त्यांच्या स्वप्नातील घर साकार करणे शक्य होईल.

■ ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज
महासागर
प्रिंट | ई-पेपर | डिजिटल | युट्यूब
सर्व काही एका छताखाली
दै. महासागर, दै. युवराष्ट्र दर्शन, नागपूर पोस्ट (इंग्रजी) आणि संपूर्ण डिजिटल प्लॅटफॉर्म,
महासागर मीडिया ग्रुप आज प्रिंटपासून डिजिटलपर्यंत सर्व माध्यमांत सक्षमपणे कार्यरत आहे.

दररोज वाचनीय – दै. महासागर
दै. महासागर हे केवळ वृत्तपत्र नाही, तर ज्ञान, संस्कार, विचार आणि संवेदनशीलतेचा ५५ वर्षांचा अखंड प्रवास आहे. दररोज वाचनीय, माहितीने परिपूर्ण आणि सर्व वयोगटांना सामावून घेणाऱ्या नव्या, नव्या पुरवण्यांच्या माध्यमातून एक व्यक्ती नव्हे तर अवघं कुटुंब वाचावं, हाच आमचा प्रामाणिक उद्देश आहे.
गेल्या ५५ वर्षांपासून सामाजिकतेचा वसा जपणारे दै. महासागर, समाजप्रबोधन, शिक्षण, संस्कृती, आरोग्य, साहित्य आणि अध्यात्म या सर्वांचा संतुलित संगम साधत आहे. आपणही या वाचनसंस्कृतीचा भाग व्हावा, हीच आमची आपेक्षा.

दर दिवशी विशेष वाचनीय पुरवणी दै. महासागर सोबत

सोमवार – कॅलिडोस्कोप
विश्वनिर्मितीपासून ते नव्या शोधांपर्यंतचा प्रवास
या सदरातून वाचकांना विज्ञान, अंतराळ, निसर्ग, तंत्रज्ञान आणि संशोधनाच्या अद्भुत विश्वात घेऊन जाण्याचा प्रयत्न केला जातो. विश्वाची निर्मिती कशी झाली, पृथ्वीचे रहस्य, आधुनिक विज्ञानातील नवे शोध, AI, अंतराळ मोहिमा, सर्व काही सोप्या, समजेल अशा भाषेत.
• विद्यार्थ्यांपासून जिज्ञासू वाचकांपर्यंत सर्वांसाठी बौद्धिक मेजवानी.

मंगळवार – जोश
तरुणाईसाठी प्रेरणादायी ऊर्जा
फॅशन, फूड, करियर, यशकथा, स्टार्टअप्स, नवे ट्रेंड्स, आजच्या नव्या दमाच्या तरुणाईला जगण्यासाठी बळ देणारे सदर म्हणजे 'जोश'.
• अपयशातून उभे राहण्याच्या कथा, करियर मार्गदर्शन, आत्मविश्वास वाढवणारे लेख
• जीवनात "मीही करू शकतो" हा विश्वास निर्माण करणारे विचार

बुधवार – निरामय
चांगल्या आरोग्यासाठी खास मार्गदर्शन
आरोग्य ही खरी संपत्ती आहे, हेच या सदराचे सूत्र. दैनंदिन आरोग्य टिप्स, आहार, व्यायाम, मानसिक आरोग्य, तज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन, सर्वसामान्यांना उपयोगी पडेल असे व्यवहार्य आरोग्यज्ञान येथे मांडले जाते.
• आजारांपेक्षा आरोग्य जपण्यावर भर.

गुरुवार – अस्मिता
छंद, कौशल्य आणि नव्या निर्मितीचा शोध
माणूस केवळ नोकरीने नाही, तर त्याच्या छंदानेही जगतो.
लेखन, चित्रकला, संगीत, हस्तकला, फोटोग्राफी, उद्योजकता,
स्वतःमधील सुप्त कला ओळखण्यास मदत करणारे सदर.
• व्यक्तिमत्त्व विकास आणि आत्मसन्मान वाढवणारे लेखन.

शुक्रवार – भक्ती मार्ग
भक्ती, श्रद्धा आणि जीवनमूल्यांचा मार्ग
भक्तीचा मार्ग शेवटी सुखाकडे नेतो,
काय चांगले, काय वाईट, कर्म,कर्तव्य, देवाचा महिमा आणि माणूस म्हणून आपली जबाबदारी
या साऱ्यांवर चिंतन करणारे आध्यात्मिक सदर.
• मनाला शांतता, जीवनाला दिशा देणारे विचार.

शनिवार – बालांगण
लहानग्यांचे निरागस विश्व
मुलांना काय हवे आहे, काय नको
त्यांचे भावविश्व, शिक्षण, खेळ, संस्कार, पालकांसाठी मार्गदर्शन
या सर्वांचा समतोल साधणारे सदर.
• उद्याच्या पिढीचा विचार आजच.

रविवार – साहित्य मैफिल
शब्दांची, विचारांची आणि भावनांची मेजवानी
कविता, कथा, लेख, समीक्षा,भ्रमंती लाईव्ह स्टोरी सदर
नवोदित व प्रस्थापित लेखकांचे दर्जेदार साहित्य
दै. महासागरची साहित्यिक परंपरा जपणारे हे सदर.
• साहित्यप्रेमींना विचारांची समृद्धी देणारे व्यासपीठ.

'खरीखरी' हा विशेष अग्राग्रलेख
दररोज ज्येष्ठ संपादक व विचारवंत श्रीकृष्ण चांडक यांचा 'खरीखरी' हा विशेष अग्राग्रलेख दै. महासागरमध्ये नियमितपणे प्रसिद्ध होतो.दररोज स्वतःच्या नावाने अग्रलेख लिहिणारे ते राज्यातील पहिले वृत्तपत्र मालक, संचालक संपादक ठरले आहेत.'खरीखरी' या सदरातून ते कोणताही आडपडदा न ठेवता समाज, राजकारण, प्रशासन आणि लोकजीवनातील वास्तव मांडतात.सत्तेच्या विरोधात उभे राहण्याचे धाडस, अन्यायाविरुद्ध स्पष्ट भूमिका आणि सामान्य माणसाच्या बाजूने ठामपणे बोलण्याची ताकद, हेच या अग्राग्रलेखाचे वैशिष्ट्य आहे.

दै. महासागर म्हणजे बातम्यांसोबत विचार, वाचनासोबत संस्कार आणि समाजासोबत आपुलकी दररोज वाचनीय, दररोज उपयुक्त.

ई-पेपर – महासागर मीडिया ग्रुप
https://epaper.dainikmahasagar.in
दै. महासागर, दै. युवराष्ट्र दर्शन आणि नागपूर पोस्ट (इंग्रजी) हे सर्व वृत्तपत्रे आता जगाच्या कुठल्याही कोपऱ्यातून, कुठेही आणि कधीही सहज वाचता येतात.
• आकर्षक आणि आधुनिक मांडणी
• एका क्लिकवर सर्व पेपर्स उपलब्ध
• मोबाईल, टॅब, लॅपटॉपवर सहज वाचन

डिजिटल महासागर मीडिया ग्रुप
https://dainikmahasagar.in
सर्व बातम्या एका ठिकाणी, सर्वांसाठी.
डिजिटल महासागरवर टाकलेली प्रत्येक बातमी लिंकच्या माध्यमातून तातडीने सर्वत्र पोहोचते.
• वेगवान आणि विश्वासार्ह बातम्या
• अपडेट्स रिअल टाइममध्ये
• काळ डिजिटलचा आहे आणि महासागरने त्यानुसार पुढचे पाऊल टाकले आहे.

महासागर युट्यूब न्यूज चॅनल
youtube.com / mahasagarnews
अनेक दर्जेदार शो, ग्राउंड रिपोर्टिंग, रोजच्या राजकीय-सामाजिक घडामोडी, महासागर मीडिया ग्रुपच्या सर्व लाईव्ह अपडेट्स आणि सेम टीव्हीच्या धर्तीवर उभे राहत असलेले डिजिटल व्हिडिओ साम्राज्य.
• लाईव्ह रिपोर्टिंग
• ग्राउंड रिॲलिटी
• लोकांच्या प्रश्नांना थेट व्यासपीठ

प्रिंटचा विश्वास, डिजिटलचा वेग आणि समाजासाठी पत्रकारिता.
महासागर मीडिया ग्रुप बातमी सर्व सामान्यांच्या मनातली.